MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२०

## संपादकीय

### जागतिक डास दिवस

२० ऑगस्टला सकाळी जेव्हा मी माझे ई-मेल इनबॉक्स उघडले तेव्हा माझ्या लक्षात आले की, हा दिवस 'जागतिक डास दिवस' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण दिवस, योग दिवस, माता दिवस असे अनेक दिवस साजरे केले जातात हे मला माहीत होते. तसेच; वाघ, हत्ती, गाय या प्राण्यांच्या नावाने देखील दिवस साजरा करतात हे देखील मला माहीत होते. परंतु डास या किड्याच्या नावाने दिवस साजरा करतात हे मला माहीत नव्हते. डासासारख्या त्रासदायक किड्याचे स्मरण करण्यासाठी जागतिक स्तरावर असा खटाटोप का करीत असावेत? असा प्रश्न माझ्या मनात आला. या प्रश्नाचे उत्तर शोधताना फारच उपयुक्त आणि मनोरंजक माहिती मिळाली.

हिवताप म्हणजे मलेरिया हा एक मोठा आजार आहे. या आजाराला शेकडो लोक बळी पडत असत. मलेरिया हा शब्द मॅल (mal) आणि एरिया (aria) या दोन लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. मॅल याचा अर्थ खराब आणि एरिया याचा अर्थ हवा. खराब हवेमुळे हा आजार होतो अशी रोमन लोकांची श्रद्धा होती. म्हणून या आजाराला मलेरिया (Malaria) असे नाव दिले गेले. समाजातील ही समजूत खोडून टाकून मलेरिया आजार होण्याचे नेमके कारण शोधण्याचे काम डॉ. रोनाल्ड रॉस यांनी केले. ते जन्माने ब्रिटिश असले तरी संशोधनाचे काम मात्र त्यांनी भारतातच केले.

रोनाल्डचे वडील सर सी. सी. जी. रॉस हे भारतीय सैन्यात जनरल होते. रोनाल्डचा जन्म भारतात हिमालय पर्वताजवळ असलेल्या अल्मोडा या गावी १३ मे १८५७ रोजी झाला. बालपणातील काही वर्षे भारतात घालविल्यावर औपचारिक शिक्षण घेण्यासाठी त्याच्या वडिलानी त्याला लंडनला पाठविले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून १८८१ साली तो इंडियन मेडिकल सर्विस (Indian Medical Service) मध्ये रुजू झाला. सुरुवातीला त्याची नेमणूक मद्रास परगण्यात होती. १८८० च्या दशकाच्या शेवटी शेवटी त्याची बंगलोर शहरात स्टॉफ सर्जन म्हणून नेमणूक करण्यात आली. या पदावर काम करत असताना त्याच्या मनात मलेरिया या आजाराबद्दल कुतूहल निर्माण झाले. १८९४ साली तो काही काळ सुट्टी घेऊन इंग्लंडला गेला. तिथे सर पॅट्रिक मॅन्सन (Sir Patrick Manson) या

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

शास्त्रज्ञाने असे दाखवून दिले की, मलेरिया झालेल्या व्यक्तींच्या शरीरात एका विशिष्ट प्रकारचे जंतू असतात. हे जंतू माणसाच्या शरीरात शिरतात कसे हे शोधून काढण्याचे आव्हान रोनाल्ड पुढे होते.

१८९५ साली डॉ. रोनाल्ड भारतात परत आला. सिकंदराबाद येथील प्रयोगशाळेत काम करीत असताना त्याने २० ऑगस्ट १८९७ रोजी मलेरियाग्रस्त रोगी आणि डास यांच्यातील संबंध प्रस्थापित केला. त्याच्या असे लक्षात आले की, ॲनोफिलिस डासांची मादी मलेरिया झालेल्या रोग्याला चावली की तिच्या शरीरात रोग्याच्या शरिरातील जंतू शिरतात. ही मादी जेव्हा निरोगी माणसाला चावते तेव्हा तिच्या शरीरातील जंतू निरोगी माणसाच्या शरीरात जातात. त्यामुळे त्या व्यक्तीला आजार होतो. अशा पद्धतीने डॉ. रोनाल्ड रॉस याने असे सिद्ध केले की, मलेरिया या रोगाचा संबंध अशुद्ध हवेशी नसून विशिष्ट प्रकारच्या डासांसी आहे. वैद्यकीय जगतात हे संशोधन फारच महत्त्वाचे होते. या मूलभूत संशोधनासाठी डॉ. रोनाल्ड रॉस यांना १९०२ सालचे वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. त्यांच्या कार्यात डासांनी अप्रत्यक्षपणे मदत केली म्हणून २० ऑगस्ट हा दिवस 'जागतिक डास दिवस' म्हणून साजरा करतात. हा दिवस साजरा करीत असताना आपण डासांना पळवून कसे लावता येईल याचाच विचार करीत असतो!..

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी,
खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
'मी पगार घेतो म्हणून काम करतो',
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची,
सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे
अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला
हानिकारक ठरेल, अशी कृती
मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण
फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व
स्वत:चा उद्धार आहे.

व्ही.पी.एम्.

# दिशा


**वर्ष एकविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२०**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक २ रा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | १० हॉवले प्लेस, लंडन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | शीतयुद्धाच्या दरम्यान झालेले तंटे व वाद | सहा. प्रा. सुभाष गं शिंदे | ६ |
| ४) | शेक्सपियरच्या ४०४ व्या जन्मदिनानिमित्त | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ५) | केसरीमधील संस्कृत व मराठी वचने | श्री. प्रभाकर आपटे सुधा साठ्ये | २० |
| ६) | पिळुकी / पेवरवेल | प्रकाश दुधाळकर | २१ |
| ७) | संगीत मनमोही रे भाग २ : सप्तसूर आणि राग | डॉ. कीर्ती आगाशे | २३ |
| ८) | अपराजित योद्धा - श्रीमंत बाजीराव पेशवे | प्रसाद बापट | २४ |
| ९) | मेळघाट - एक कुपोषित सत्य | अमोल आनंद लिमये | २६ |
| १०) | श्रीकृष्ण जीवन - चिंतन | महेश भानुशाली | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# १० हॉवले प्लेस, लंडन

*ऑक्टोबर १९१८ ते जुलै १९१९ या कालावधीत लोकमान्य टिळक लंडनमध्ये राहात होते. त्यांच्या राहत्या ठिकाणाला प्रत्यक्ष भेट देऊन लिहिलेला हा लेख आहे - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दरवर्षी भारतीय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या तीन शहरांतील वस्तू-संग्रहालये, ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्था यांना भेटी देण्याचा भरगच्च कार्यक्रम असतो. लंडनला पोहोचल्यावर यात आणखी एका बाबीची भर पडते. भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे अनेक स्वातंत्र्य-सैनिक लंडन मध्ये राहात असत. त्यातील काही जणांच्या राहत्या ठिकाणांना भेट देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. या बाबींचा उल्लेख मी दिशा मासिकात लिहिलेल्या काही लेखांत केला आहे. प्रस्तृत लेखात लोकमान्य टिळक ज्या घरी राहिले त्या घराला दिलेल्या भेटीविषयी माहिती दिली आहे.

ऑक्टोबर १९१८ मध्ये लोकमान्य टिळक आपल्या काही सहकार्यां सोबत लंडनला गेले. त्यांच्या राहण्यासाठी लंडनच्या पॅडिंगटन परिसरात एक बंगला भाड्याने घेण्यात आला होता. त्याचा पत्ता १० हॉवले प्लेस, लंडन (१०, Howley Place, London) असा आहे. या घरात टिळक साधारणपणे दहा महिने राहिले. हे ठिकाण दाखविण्यासाठी आम्ही सहलीत सहभागी झालेल्या सर्व सभासदांना हॉवले प्लेसला घेऊन जातो. लंडन शहरातील प्रवास आम्ही प्रामुख्याने लंडन भुयारी रेल्वेने करतो. हॉवले प्लेस हे वारिक एव्हेन्यू (Warick-venue) या भुयारी स्टेशनजवळ आहे. म्हणून आम्ही वारिक एव्हेन्यू पर्यंत भुयारी रेल्वेने जातो. तिथून बाहेर पडलो की सुमारे एक दीड किलोमीटरचे अंतर पायी जावे लागते. रस्ता चांगला रूंद असून दोन्ही बाजूला फूटपाथ आहे. या फूटपाथवरून गप्पा मारत जात असताना आपल्या नजरेस पडतो तो एक कालवा. या कालव्यातून अनेक बोटी ये-जा करताना दिसतात. कालवा आणि त्यातून भ्रमंती करणाऱ्या बोटींमुळे या परिसराला छोटे व्हेनिस (Little Venice) असे नाव दिले आहे. आमच्या चमूतील काही सभासद येथे थोडा वेळ घुटमळतात.

कालवा ओलांडून पुढे चालत राहिलो की हॉवले प्लेस अशी पाटी आपल्या नजरेस पडते. त्या रस्त्याला आपण वळलो की आपल्याला रस्त्याच्या दोन्ही बाजूला बंगल्यांची रांग दिसते. सम अंक असलेले बंगले एका बाजूला तर विषम अंक असलेले बंगले दुसऱ्या बाजूला, अशी तिथे पद्धत आहे. सम अंकाचे बंगले डाव्या बाजूला आहेत. प्रत्येक बंगल्यांच्या प्रवेशद्वारावर त्याचा क्रमांक स्पष्ट दिसेल अशी व्यवस्था आहे. त्यामुळे १० क्रमांक असलेले घर शोधायला फार वेळ लागत नाही. तेथे पोहोचताच एक पांढरा शुभ्र दुमजली बंगला आपले लक्ष वेधून घेतो.



**१०, हॉवले प्लेस**

हे घर दाखवेपर्यंत या ठिकाणाबद्दल आणि टिळकांच्या लंडन मधील वास्तव्याबद्दल फारशी माहिती सभासदांना दिलेली नसते. त्यामुळे हे ठिकाण पाहून झाल्यानंतर त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. टिळक इंग्लंडला कशासाठी आले? हा त्यातला पहिला प्रश्न असतो. मी जेव्हा हे ठिकाण पहिल्या वेळेस पाहिले तेव्हा देखील माझ्या मनात हाच प्रश्न आला होता. त्यावेळेस माझ्यासोबत बेडफोर्ड येथे राहणारे डॉ. वासुदेव गोडबोले होते. ते मागील पाच दशकांहून जास्त काळ इंग्लंड मध्ये राहात आहेत. त्यांनी लंडन मधील भारतीय स्वातंत्र्यवीर या विषयावर विशेष अभ्यास केला आहे. त्यांच्या आधारे ते एक दिवसाची लंडन सहल आयोजित करीत असतात. आम्ही जेव्हा लंडनला जातो तेव्हा त्यांना वेळ असेल तर त्यांची मदत घेतो. ते मग सविस्तर माहिती सांगतात.

लंडनच्या न्यायालयात टिळकांनी सर व्हॅलेंटाईन चिरोल (Sir Valentine Chirol) यांच्या विरुद्ध मानहानीचा खटला भरला होता. या खटल्याच्या सुनावणीसाठी ते ऑक्टोबर १९१८ मध्ये लंडनला आले. चिरोल हे एक पत्रकार होते. लंडन टाईम्स या नियतकालिकात ते लिहीत असत. १९१० साली ते भारतात आले. भारतातील स्वातंत्र्य चळवळीचा त्याने जवळून अभ्यास केला. त्या आधारे त्याने एक लेखमाला लंडनच्या टाईम्स मध्ये लिहिली. या लेखांचे संकलन करून त्याने इंडियन अनरेस्ट (Indian Unrest) नावाचे एक पुस्तक लिहिले. या पुस्तकात त्याने लोकमान्य टिळकांचा 'भारतीय असंतोषाचे जनक' (Father of Indian Unrest) असा उल्लेख केला आहे. जेंव्हा हे पुस्तक प्रकाशित झाले तेव्हा टिळक मंडालेच्या तुरूंगात होते. त्यांची मंडालेच्या तुरूंगातून सुटका झाल्यानंतर ते भारतात परत आले. इथे आल्यावर त्यांच्या हातात चिरोल यांचे पुस्तक पडले. त्यांनी पुस्तकात वापरलेली भाषा ही अपमानास्पद आहे म्हणून त्यांनी चिरोल यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला. चिरोल तेव्हा लंडनला परत गेले होते. त्यामुळे तो खटला लंडनच्या न्यायालयात चालविण्यात आला. जोसेफ सायमन या ब्रिटिश वकीलाने टिळकांची बाजू मांडली. २९ जानेवारी ते २१ फेब्रुवारी या दरम्यान खटल्याची सुनावणी झाली. निकाल अपेक्षेप्रमाणे चिरोल यांच्या बाजूने लागला. या खटल्यापायी टिळकांना मोठीच आर्थिक झड सोसावी लागली. ते सगळे पैसे भारतातील लोकांनी वर्गणीतून गोळा केले. टिळक जेव्हा भारतात परत आले तेव्हा, 'तुम्ही तर मला विकतच घेतलं आहे' अशा भाषेत त्यांनी इथल्या जनतेचे आभार मानले.

खटल्याचा निकाल फेब्रुवारी महिन्यातच लागला. तरीदेखील टिळक ऑक्टोबर संपेपर्यंत लंडन मध्ये राहिले. खटला हे लंडनला जाण्याचे एक निमित्त होते. त्या निमित्ताने त्यांना अनेक गोष्टी साधून घ्यायच्या होत्या. ते जेवढा काळ लंडनमध्ये राहिले तेवढा काळ त्यांच्या भेटीगाठी आणि सभासंमेलने चालू होती. त्यांच्या घराचे दरवाजे भेटायला येणाऱ्या पाहुण्यांसाठी सतत उघडे असत. त्यांना भेटायला येणाऱ्या आगंतुकांमध्ये भारतीय तसेच युरोपियन लोक असत. एकदा चिंतामण देशमुख त्यांना भेटायला आले होते. आयसीएस परीक्षेत ते पहिले आले होते. तरीही आयसीएस बनून इंग्रज सरकारची नोकरी करावी की स्वातंत्र्य लढ्यात सहभागी व्हावे या द्विधावस्थेत ते होते. तेव्हा टिळकांनी त्यांना सरकारी नोकरीत राहून व्यवस्थापनाचा अनुभव घेण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, 'आज ना उद्या भारताला स्वातंत्र्य मिळेल. तेव्हा आपल्याला तुमच्यासारख्या अनुभवी व्यवस्थापकाची गरज भासेल.' त्यांचा सल्ला देशमुखांनी मानला. स्वातंत्र्यानंतरच्या मंत्री मंडळात त्यांनी अर्थमंत्री पद भूषविले.

आपल्या लंडनच्या वास्तव्यात टिळकांनी महत्त्वाचे

---

मोठी व्यक्ती, 'संधी मिळाली नाही' अशी तक्रार कधीच करीत नाही.

राजकीय कार्य केले. लेबर पार्टीच्या पुढाऱ्यांशी त्यांनी संधान बांधले. लंडन आणि लंडन शहराच्या बाहेर अनेक राजकीय सभांना ते हजर राहात असत. एकदा तर ते घरात पडले, तेव्हा त्यांच्या पायाला लागले. तरीही त्यांनी राजकीय बैठका रद्द केल्या नाहीत. व्याख्यान देण्यासाठी त्यांना उभे राहणे अशक्य असले तरी खुर्चीवर बसून ते व्याख्यान देत असत. त्यांचे हॉवले प्लेस येथील घर म्हणजे एक राजकीय कार्यालयच झाले. जुलै १९१९ च्या शेवटी त्यांनी हे घर सोडले. त्यानंतर ते ६०, टॅलबॉट रोड (६०, Talbot Road) येथे राहायला गेले. ऑक्टोबर १९१९ च्या शेवटच्या आठवड्यात ते भारतात परत येण्यासाठी लंडनहून निघाले.

एखाद्या घरी कुणी महत्त्वाची व्यक्ती राहिली असेल तर त्या घरावर पाटी लावण्याची इंग्लंड मध्ये पद्धत आहे. त्याला 'नील फलक' (Blue Plaque) असे म्हणतात. असे अनेक नील फलक लंडन शहरात आढळतात. १९५६ हे टिळकांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्या निमित्ताने १०, हॉवले प्लेस येथे टिळकांच्या नावाची पाटी लावण्याचा निर्णय लंडन काऊंटी कौन्सिलने घेतला. त्या संस्थेने जेव्हा घराच्या मालकाकडे परवानगी मागितली तेव्हा त्यांनी परवानगी दिली नाही. त्यामुळे नील फलक टिळकांच्या दुसऱ्या घरी म्हणजे ६०, टॅलबॉट रोड (60 Tolbot Road) येथे लावण्यात आला. १९६५ साली त्या परिसरातील घरे तोडून अपार्टमेंट बांधण्याची योजना आखण्यात आली. त्यामुळे तेथे लावलेला फलक काढून ठेवण्यात आला. त्यानंतर २० वर्षांनी इंग्लिश हेरिटेजने (English Heritage) पुन्हा प्रयत्न सुरू केले. तोपर्यंत घराची मालकी बदलली होती. एका अमेरिकन माणसाने ते घर विकत घेतले होते. त्यांना जेव्हा नील फलक लावण्याबाबत विचारले तेव्हा त्यांनी आनंदाने होकार दिला. २९ ऑक्टोबर १९८८ रोजी समारंभपूर्वक या घरावर नील फलक लावण्यात आला. या कार्यक्रमाला जयवंतराव टिळक आणि दीपक टिळक उपस्थित होते. त्याचबरोबर पुणे महापालिकेचे महापौर अंकुश काकडे त्यांच्या काही सहकाऱ्यांसह कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिले. लंडन शहरातील राजकीय पुढारी, भारतीय दूतावासातील अधिकारी आणि इतर पाहुण्यांच्या उपस्थितीत फलकाचे अनावरण करण्यात आले.




**इमारतीवरील नील फलक**

१०, हॉवले प्लेस या इमारतीच्या पुढच्या भिंतीवर आधीपासूनच एक फलक आहे. त्यावर अँटोनिओ गिवोनी कॅनॅलेटो या चित्रकाराचा येथे स्टुडिओ होता अशी माहिति आहे. त्यामुळे टिळकांच्या नावाचा फलक बाजूच्या भिंतीवर लावण्यात आला आहे. रस्त्यावरून पाहिला तर तो जरा तिरपा दिसतो. फलकाचे चांगले दर्शन होण्यासाठी बाजूला असलेल्या १२ क्रमांकाच्या घराच्या आवारात जावे लागते. त्या घराच्या मालकाची परवानगी घेऊन मी अनेकदा आत गेलो आहे. परंतु प्रत्येक वेळी ते शक्य होईलच असे सांगता येत नाही. फलकावर लिहिलेला मजकूर असा आहे -

(पृष्ठ क्र.३१ वर)

# शीतयुद्धाच्या दरम्यान झालेले तंटे व वाद
## (भाग – २)

*दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये सुरू झालेल्या शीतयुद्धाविषयी माहिती देणारा लेख- संपादक*

**जर्मनी**

जर्मनी हा देश शीतयुद्धाचा पहिला बळी ठरला. शीतयुद्धकालीन सोवियत संघ व अमेरिका यांच्यातील वादामुळे जर्मनीचे पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशा दोन देशांमध्ये विभाजन झाले असे म्हणणे वावगे ठरू नये. पश्चिम जर्मनी हा देश 'बॉन रिपब्लिक' म्हणून देखील ओळखला जाऊ लागला. पश्चिम जर्मनी या देशामध्ये लोकशाही प्रकारचे शासन प्रस्थापित करण्यात आले. हा देश अमेरिका, इंग्लंड व त्यांचे इतर लोकशाहीवादी व भांडवलशाहीत विश्वास असणाऱ्या देशांचा मित्र बनला. तर पूर्व जर्मनीमध्ये साम्यवादी राजवटीची स्थापना करण्यात आली व हा देश सोविएत संघाच्या प्रभावाखाली आला. अर्थात पूर्व जर्मनीत साम्यवादी राजवट प्रस्थापित करण्यात सोविएत संघाची महत्त्वाची भूमिका होती. त्यामुळे पूर्व व पश्चिम जर्मनी बाबतीत शीतयुद्धाच्या काळात असे चित्र निर्माण झाले की, पश्चिम जर्मनी अमेरिका व तिच्या मित्रांसोबत होता तर पूर्व जर्मनी सोविएत संघाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी गटामधील देश होता. पूर्व व पश्चिम जर्मनी हे दोन देश १९४९ सालात निर्माण झाले. दुसऱ्या महायुद्धादरम्यान पूर्वेकडून सोविएत संघाचे सैन्य; तर पश्चिमेकडून अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या मित्र राष्ट्रांचे सैन्य जर्मनीवर चढाई करून आले. त्यामुळे जर्मनीचा पूर्वेकडील भाग सोविएत संघाच्या आधिपत्याखाली; तर जर्मनीचा पश्चिमेकडील भाग अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या मित्र राष्ट्रांच्या ताब्यात आला होता. १९४५ साली हिटलरने आत्महत्या केली व जर्मनीने दुसऱ्या महायुद्धात हार पत्करली. यावेळी येथे नमूद केल्याप्रमाणे जर्मनीचा पूर्वभाग म्हणजेच पूर्व जर्मनी सोविएत संघाच्या नियंत्रणाखाली; तर पश्चिम जर्मनी अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांच्या नियंत्रणाखाली होता. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोविएत संघ या दोन महासत्तांमधील वादांमुळे व शीत युद्धामुळे जर्मनीचे पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी या दोन देशांमध्ये विभाजन झाले. साधारणतः १९४९ ते १९९० या कालावधीत जर्मनी हा देश पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशा दोन देशांमध्ये विभागलेला होता. परंतु १९९० साली पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी या दोन देशांचे एकीकरण होऊन पुन्हा एकदा अखंड जर्मनी हा देश निर्माण झाला. २ डिसेंबर १९९० रोजी अखंड जर्मनी वा पुन्हा एकदा एकत्रीकरण झालेल्या जर्मनी या देशात चान्सलर पदाच्या म्हणजेच पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत विजयी होण्याचा मान हेलमट कोह्ल (Helmut Kohl) यांना मिळाला. ते यापूर्वी पश्चिम जर्मनीचे पंतप्रधान होते. असे म्हटले जाते की अनेकदा इतिहासाची पुनरावृत्ती होते. जर्मनीच्या एकीकरणाबाबत देखील असेच म्हणता येईल. एकोणिसाव्या शतकात १८७१ चाली बीस्मार्कच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण झाले होते. यानंतर युरोपमधील एक बलाढ्य राष्ट्र म्हणून जर्मनी पुढे आले होते. विसाव्या शतकात दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धामुळे जर्मनीचे पुन्हा एकदा विभाजन झाले. परंतु १९९० साली इतिहासाची पुन्हा एकदा पुनरावृत्ती झाली व जर्मनीचे एकीकरण झाले. त्यानंतर आजच्या घडीपर्यंत जर्मनीने विविध क्षेत्रांमध्ये मोठी प्रगती केलेली असून

जर्मनी हा देश युरोपमधील एक प्रगत व प्रबळ देश म्हणून ओळखला जातो.

**बर्लिनची नाकेबंदी (१९४८-४९)**

पूर्व जर्मनी या देशाची राजधानी बर्लिन या शहराचे देखील पूर्व बर्लिन पश्चिम बर्लिन अशा दोन भागांमध्ये विभाजन झाले. तसे पाहता बर्लिन हे शहर भौगोलिकदृष्ट्या पूर्व जर्मनी मध्ये होते. परंतु येथे नमूद केल्याप्रमाणे शीतयुद्धामुळे या शहराचे पूर्व व पश्चिम बर्लिन अशा दोन भागांमध्ये विभाजन झाले. यापैकी पूर्व बर्लिन वर सोविएत संघाचा प्रभाव होता तर पश्चिम बर्लिन शहरावर अमेरिका इंग्लंड व फ्रान्स या देशांचे नियंत्रण होते वा पश्चिम बर्लिन शहरातील जनतेचा या तीन देशांना पाठिंबा होता असे म्हणणे वावगे ठरू नये. सोविएत संघाने निकिता ख्रुश्चेव याच्या काळात पूर्व बर्लिनमधील लोकांना पश्चिम बर्लिन मध्ये जाण्याची मनाई केली होती. तसेच पूर्व बर्लिनमधील जनतेला पश्चिम बर्लिन मध्ये जाण्यापासून रोखण्यासाठी १९६१ साली सोविएत संघाच्या आदेशानुसार बर्लिनची भिंत बांधण्यात आली होती. तत्पूर्वी २४ जून १९४८ सोविएत संघाने बर्लिनची नाकेबंदी सुरू केली. पश्चिम बर्लिनकडे येणारे रस्ते, लोहमार्ग व कालवे बंद करण्यात आल्यामुळे वा त्यांची नाकेबंदी करण्यात आल्यामुळे पश्चिम बर्लिन मधील जनतेचे हाल होणे साहाजिक होते. सोविएत संघाने पश्चिम बर्लिनच्या केलेल्या या नाकेबंदीला उत्तर म्हणून अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांनी विमानांच्या सहाय्याने आकाशातून पश्चिम बर्लिन मधील रहिवाशांना लागणाऱ्या विविध वस्तू जमिनीवर टाकण्याचे ठरविले. या योजनेनुसार अमेरिकेच्या इंग्लंड, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलँड, दक्षिण आफ्रिका आदी देशांच्या हवाईदलांनी सदर उपक्रमात सहभाग घेतला व विमानांच्या साहाय्याने वर नमूद केल्याप्रमाणे पश्चिम बर्लिनकरांना लागणाऱ्या विविध वस्तू विमानाच्या साह्याने जमिनीवर टाकण्यात आल्या. १२ मे १९४९ रोजी सुमित संघाने बर्लिनची नाकेबंदी मागे घेण्यात आल्याचे वा संपविण्यात आल्याची घोषणा केली. परंतु अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांनी ३० सप्टेंबर १९४९ पर्यंत विमानांच्या साहाय्याने पश्चिम बर्लिन मध्ये वेगवेगळ्या वस्तू आकाशातून जमिनीवर टाकण्याचा उपक्रम चालूच ठेवला. यामागचे प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेला व तिच्या मित्र राष्ट्रांना असे वाटत होते की, जरी रशियन लोकांनी १२ मे १९४९ रोजी बर्लिनची नाकेबंदी मागे घेतल्याची घोषणा केली असली तरी ते कुठल्याही क्षणी पुन्हा एकदा पश्चिम बर्लिनची नाकेबंदी करू शकतात. असे म्हटले जाते की, पश्चिम बर्लिनच्या नाकेबंदीच्या काळात अमेरिकन हवाई दलाने १,७८३,५७३ टन एवढे सामान; तर इंग्लंडच्या हवाईदलाने ५४१,९३७ एवढे सामान वा वस्तू विमानांच्या साहाय्याने पश्चिम बर्लिन करांसाठी जमिनीवर टाकल्या होत्या.

शीतयुद्ध काळातील अजून एक महत्त्वाचा तंटा म्हणजे १९५० या वर्षात झालेले कोरियन युद्ध हा होय. कोरिया हा आशिया खंडाच्या अति पूर्वेला असलेला एक छोटा देश होता. चीन व कोरिया हे शेजारी राष्ट्र होते. चीन व कोरिया या दोन देशांमधील सीमारेषा यलू ही नदी होती. जपान व कोरिया यांच्यामध्ये जपानचा समुद्र आहे. एकोणिसाव्या शतकापासूनच जपानची कोरियावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याची मनीषा होती. याचे प्रमुख कारण म्हणजे साधारणतः १८५३ नंतर जपानने मोठ्या प्रमाणात औद्योगिक प्रगती करण्यास सुरुवात केली व त्यामुळे जपानला कच्च्या मालाचा पुरवठा करणारी वसाहत, तसेच कारखान्यात निर्माण होणारा पक्का माल विकण्यासाठी एक हक्काची बाजारपेठ हवी होती. तसेच जपानची लोकसंख्या वाढत होती व जपानला अन्नधान्यांचा पुरवठा करणाऱ्या स्रोतांचा देखील शोध आवश्यक होता. या कारणांमुळे जपानला

कोरिया वरच नव्हे तर चीनच्या मंचुरिया या प्रांतावर देखील आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा होती. कोरियामध्ये एकोणिसाव्या शतकात चीनचा देखील हस्तक्षेप असल्यामुळे कोरियाच्या प्रश्नावरून चीन व जपान यांच्यात संघर्ष होणे अटळ होते. यातूनच चीन व जपान यांच्यात कोरियावरून १८९४-९५ या वर्षात एक युद्ध झाले. जेव्हा या युद्धाची सुरुवात झाली तेव्हा इतर देशांना असे वाटत होते की, चिमुकल्या जपानला चीन सारखा क्षेत्रफळाने अतिशय मोठा असणारा देश सहज हरवेल. परंतु जपानने सर्व जगाला आश्चर्यचकित करून या युद्धात चीनचा पराभव केला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत जपान हा देश अतिपूर्वेकडील एक प्रगत व मोठ्या प्रमाणात औद्योगीकीकरण झालेला देश म्हणून नावलौकिकास पावला. त्यामुळे १९०२-०३ या सालात इंग्लंड सारख्या जागतिक व प्रबळ सत्तेने जपान बरोबर मैत्रीचा करार केला. इंग्लंड बरोबर झालेल्या या मैत्री करारामुळे जपानची इतर देशांच्या नजरेत इभ्रत वाढली. १९०४-०५ मध्ये रशियासोबत झालेल्या युद्धात जपानने रशियासारख्या क्षेत्रफळाने विशाल असणाऱ्या युरोपियन सत्तेचा पाडाव केला. जपानने रशियाचा केलेला पराभव म्हणजे एक प्रकारची किमया होती. असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जपानने युरोपियन सत्तांना दिलेला हा मोठा धक्का होता. रशियाचा पराभव केल्यामुळे जपानचा जगातील व प्रामुख्याने अतिपूर्वेकडील दबदबा वाढला. या विजयामुळे जपानच्या महत्त्वाकांक्षा अजून वृद्धींगत झाल्या व जपान देखील युरोपियन सत्तांप्रमाणेच एक साम्राज्यवादी देश म्हणून ओळखला जाऊ लागला. अखेर १९१० या वर्षात जपानने कोरियावर आपले संपूर्ण प्रभुत्व वा नियंत्रण प्रस्थापित केले व एकप्रकारे कोरिया जपानच्या पूर्णपणे ताब्यात आला. १९१० पासून ते दुसऱ्या महायुद्धाचा शेवट होईपर्यंत म्हणजेच १९४५ सालापर्यंत कोरिया हा देश जपानच्याच नियंत्रणाखाली होता.

१९४५ या वर्षात जेव्हा जपानचा पराभव करून कोरिया हा देश जपानच्या नियंत्रणाखालून मुक्त करण्यात आला तेव्हा कोरियाच्या दक्षिण भागामध्ये अमेरिकेचे सैन्य शिरले होते व ३८ अक्षांश रेषेच्या वर म्हणजेच उत्तरेला सोविएत संघाचे सैन्य होते. याचाच अर्थ असा की, उत्तरेकडून कोरियामध्ये सोविएत संघाचे सैन्य शिरले, तर दक्षिणेकडून अमेरिकेचे सैन्य घुसले. अशाप्रकारे ३८ अक्षांश रेषा ही रशियन सैन्य असलेल्या उत्तरेकडील कोरिया व अमेरिकन सैन्य तैनात असलेल्या दक्षिणेकडील कोरिया यांच्यामधील एक प्रकारची अलिखित सीमारेषा बनली. त्यावेळी कुणालाही वाटले नव्हते की, ३८ अक्षांश रेषा ही कायमस्वरूपी सीमारेषा बनून अतिपूर्वेकडील छोटासा देश उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया अशा दोन देशांमध्ये येणाऱ्या काळात विभागलेलाच राहील. आजही उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया हे दोन वेगळे व स्वतंत्र देश आहेत. कोरियाचे अशाप्रकारे उत्तर व दक्षिण कोरिया या दोन देशांमध्ये विभाजन झाल्यानंतर उत्तर कोरियात साम्यवादी राजवट अस्तित्वात आली, तर दक्षिण कोरियात लोकशाही प्रस्थापित झाली. १९४८ साली कोरियाचे खऱ्या अर्थाने विभाजन होऊन उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया हे दोन देश निर्माण झाले. दुसरा किम सुंग (Kim Il Sung) हा साम्यवादी उत्तर कोरियाचा शासक बनला, तर सिंगमन री (Syngman Rhee) हे लोकशाहीवादी दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. प्यॉंगयांग (Pyongyang) उत्तर कोरियाची राजधानी बनली, तर सेऊल (Seoul) हे शहर दक्षिण कोरियाची राजधानी बनले.

१९५० या वर्षात उत्तर कोरियाने ३८ अक्षांश रेषा पार करून आपले सैन्य दक्षिण कोरियात घुसवले. म्हणजेच दक्षिण कोरियावर आक्रमण केले व दक्षिण कोरियाचा बराचसा भाग ताब्यात घेतला. अमेरिकेला अशी शंका

होती की, सोविएत संघानेच उत्तर कोरियाला दक्षिण कोरियावर आक्रमण करण्यासाठी भरीस घातलेले असणार. अमेरिकेने या प्रकरणात संयुक्त राष्ट्र संघटनेला दक्षिण कोरियाला लष्करी मदत देण्यासाठी राजी करून घेतले. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेने दक्षिण कोरियाला सैनिकी मदत देण्याचा प्रस्ताव मंजूर करून, संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे या देशाला उत्तर कोरिया विरुद्ध लष्करी मदत देण्याचे ठरले. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आदेशानुसार जवळजवळ १४ राष्ट्रांच्या देशांनी दक्षिण कोरियाला लष्करी मदत दिली; परंतु सर्वात मोठी व जास्त प्रमाणात अमेरिकेने कुमक पाठविली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या या सैन्याचे नेतृत्व अमेरिकन लष्करप्रमुख डग्लस मॅकार्थर हा करत होता. डग्लस मॅकार्थर याच्या नेतृत्वाखालील संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सैन्याने उत्तर कोरियाच्या सैन्याला यशस्वीरित्या ३८ अक्षांश रेषेच्या वर म्हणजेच उत्तरेला परतवून लावले. संयुक्त राष्ट्र संघटनेचे हे सैन्य उत्तर कोरिया पादाक्रांत करून उत्तर कोरिया व चीन यांच्यामधील सीमारेषा असलेल्या यलू या नदीपर्यंत जाऊन पोहोचले. यावेळी चीनला असे वाटले की, अमेरिकन लष्करप्रमुखाच्या नेतृत्वाखालील संयुक्त राष्ट्र संघटनेचे हे सैन्य साम्यवादी चीन मध्ये घुसू शकेल. त्यामुळे चीनच्या सैन्याने उत्तर कोरियात प्रवेश केला व संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सैन्याला पुन्हा एकदा ३८ अक्षांश रेषेच्या दक्षिणेला लोटून लावले. अशाप्रकारे चीनच्या सैन्याने उत्तर कोरियाला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सैन्याला मागे हटवून मुक्त केले व दक्षिण कोरियावर ताबा मिळविला. त्यामुळे अमेरिकन सैन्याने पुन्हा एकदा चीनच्या व उत्तर कोरियाच्या सैन्याला जशास तसे उत्तर देऊन त्यांना पुन्हा एकदा ३८ अक्षांश रेषेच्या उत्तरेला लोटून दिले. चीनच्या या हस्तक्षेपामुळे डग्लस मॅकार्थर चिडून गेले होते. आता त्यांना असे वाटले की, दक्षिण कोरियासह चीन मधून देखील साम्यवादी राजवटीचे उच्चाटन करून टाकावे. परंतु अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष ट्रुमन मन यांना डग्लस मॅकार्थर यांची ही योजना मान्य नव्हती. ट्रुमन यांना दक्षिण कोरियाला उत्तर कोरियाने केलेल्या आक्रमणापासून मुक्त केले व तेथील लोकशाहीचे रक्षण केले यावरच थांबावयाचे होते. त्यामुळे त्यांनी लष्कर प्रमुख डग्लस मॅकार्थर यांना मायदेशी म्हणजेच अमेरिकेला परत बोलावून घेतले. डग्लस मॅकार्थर हे अतिशय उच्च दर्जाचे सेनानी व युद्धनीतीची जाणीव असणारे निष्णात असे लष्करप्रमुख होते. त्यांनी दुसऱ्या महायुद्धात जपान विरुद्ध अमेरिकेच्या व मित्र राष्ट्रांच्या सैन्याचे नेतृत्व केले होते. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. कोरियाचे हे युद्ध १९५० साली सुरू झाले व १९५३ मध्ये संपले. आजही कोरिया हा उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया या दोन देशांमध्ये विभागलेला आहे. कोरियाचे हे विभाजन शीतयुद्ध कालीन राजकारणामुळे झाले यात वाद नाही.

### क्युबाचा पेचप्रसंग

१९५९ झाली तत्कालीन लष्करशहा फुलजेनिसा बतीस्ता झाल्दीवार (Fulgenico Batista Zaldivar) याला सत्तेवरून हटवून फिडेल कॅस्ट्रो हा क्युबाचा शासक बनला. सुरुवातीच्या काळात कॅस्ट्रोचे अमेरिकेसोबत जरी चांगले संबंध असले तरी कॅस्ट्रोने हळूहळू सोविएत संघासोबत जवळीक साधून या महासत्तेसोबत आर्थिक व व राजकीय संबंध प्रस्थापित केले. ही बाब अमेरिकेला निश्चितच रुचली नाही. शीतयुद्धासारख्या काळात अमेरिकेच्या अगदी जवळ वसलेल्या क्युबासारख्या देशाने अमेरिकेचा स्पर्धक असलेल्या सोविएत संघासोबत संधान बांधावे याचा अमेरिकेला खूप राग आला. १९६१ सालात अमेरिकेने क्युबा सोबतचे राजनैतिक संबंध तोडून टाकले. १९६१ च्या एप्रिल महिन्यात अमेरिकेने क्युबाचा पूर्वीचा शासक बतिस्ता याला हाताशी धरून सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी या आपल्या गुप्तहेर संघटनेच्या

साहाय्याने क्युबावर हल्ला करून तेथील फिडल कॅस्ट्रोची सत्ता संपुष्टात आणण्याची योजना आखली. अमेरिकेच्या सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सीने क्युबावर हल्ला करण्याच्या आखलेल्या या योजनेला 'बे ऑफ पिग्ज' ची कामगिरी म्हणून संबोधले गेले. फिडेल कॅस्ट्रोला सत्तेवरून हटवण्यासाठी अमेरिकेने आखलेली क्युबावर हल्ला करण्याची योजना पूर्णपणे अपयशी ठरली. त्यामुळे आता फिडेल कॅस्ट्रोने उघडपणे सोविएत संघाचा मित्र असल्याचे सांगून तो साम्यवादी असल्याचे जाहीर केले. फिडेल कॅस्ट्रोने अमेरिकेला दिलेला हा फार मोठा धक्का होता. अमेरिका जगाच्या इतर भागांमध्ये साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत होती. परंतु अमेरिकेच्या नाकावर टिच्चून तिच्यापासून अगदी जवळ असलेल्या क्यूबा या देशात फिडेल कॅस्ट्रोने साम्यवादाची स्थापना केली होती.

१९६२ या वर्षात निर्माण झालेला क्युबाचा क्षेपणास्त्र पेचप्रसंग म्हणजे शीतयुद्ध काळात अमेरिका व सोविएत संघ या दोन महासत्तांमध्ये झालेला हा एक मोठा वाद होय. या प्रसंगी पुन्हा एकदा अमेरिका सोविएत संघ एकमेकांसमोर उभे ठाकले होते. १९६२ या वर्षात सोविएत संघाचा पंतप्रधान व सर्वेसर्वा निकिता ख्रुश्चेव याने रशियन बनावटीची काही क्षेपणास्त्रे सागरी मार्गाने जहाजांवर लादून क्युबामध्ये नेण्याची योजना आखली होती. त्याप्रमाणे सोविएत संघाची जहाजे रशियन क्षेपणास्त्रे घेऊन अटलांटिक महासागराच्या मार्गाने चालली होती. ही क्षेपणास्त्रे क्युबात ठेवून अमेरिकेविरुद्ध केव्हाही वापरता येणार होती. अमेरिकेला या सर्व प्रकाराचा राग येणे साहाजिक होते. त्यामुळे अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकेच्या नौदलाला रशियाची क्षेपणास्त्रे घेऊन येणाऱ्या जहाजांना अटलांटिक महासागरात रोखण्याचे आदेश दिले. अवघे त्रेचाळीस वर्षे एवढे वय असणारा अमेरिकेचा तरुण राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी सोविएत संघाविरुद्ध अशा प्रकारची कडक कारवाई करू शकेल असे ख्रुश्चेवला वाटले नव्हते. परंतु केनेडीने रशियाची जहाजे अटलांटिक महासागरात रोखण्याचे अमेरिकेच्या नौदलाला दिलेले आदेश पाहून ख्रुश्चेवने एक पाऊल मागे हटण्याचा निर्णय घेतला. ख्रुश्चेवने क्यूबातून रशियन क्षेपणास्त्रे हटविण्याचे जाहीर केले. तसेच तुर्कस्तानमध्ये ठेवलेली जुपिटर क्षेपणास्त्रे हटवावीत असे अमेरिकेला सुचविले व अमेरिका भविष्यात हल्ला करणार नाही अशी अमेरिकेकडून ग्वाही घेतली. अमेरिकेने सोविएत संघाचा हा प्रस्ताव मान्य केला. सोविएत संघाने देखील क्यूबातून आपली सर्व क्षेपणास्त्रे काढून घेतली. अशाप्रकारे क्युबाचा पेचप्रसंग सोडविण्यात आला. हा सर्व प्रकार चालू असताना सर्व जग चिंताक्रांत झाले होते. अनेक देशांना व जगभरातील लोकांना असे वाटत होते की, क्युबाच्या या पेचप्रसंगावरून अमेरिका व सोविएत संघ या दोन महासत्तांमध्ये अणूयुद्ध होऊ शकते. याचाच अर्थ असा की, अनेकांना असे वाटत होते की, या प्रकरणावरून अमेरिका व सोविएत संघात युद्ध सुरू होईल व या दोन महासत्ता एकमेकांविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करतील. परंतु अमेरिका व सोविएत संघ या दोन्ही देशांतील तत्कालीन शासकांना सुबुद्धी सुचली व जगात होऊ घातलेले एक मोठे युद्ध रोखले गेले.

**मार्शल प्लॅन**

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमधील देशांना आर्थिक मदत देण्यासाठी अमेरिकेने मार्शल प्लॅन नामक एक महत्त्वाकांक्षी योजना आखली. दुसऱ्या महायुद्धामुळे युरोपमधील देशांचे आर्थिकदृष्ट्या कंबरडे मोडून गेले होते. त्यामुळे प्रामुख्याने पश्चिम युरोप व दक्षिण युरोप मधील देशांना आर्थिक मदत देण्यासाठी अमेरिकेने मार्शल प्लॅन ही योजना आखली. असे असले तरी अमेरिकेने मार्शल योजनेअंतर्गत पूर्व युरोपातील साम्यवादी

देशांनादेखील मदत देऊ केली होती. परंतु हे देश सोविएत संघाच्या आधिपत्याखाली असल्यामुळे अर्थातच या देशांनी अमेरिकेने देऊ केलेली आर्थिक मदत नाकारली. युरोपमधील देशांच्या अर्थव्यवस्था दुसऱ्या महायुद्धामुळे उद्ध्वस्त झाल्या होत्या. अशावेळी जर त्यांना आर्थिक पुनर्निर्माण व विकास करण्यासाठी मदत दिली नाही तर हे देश साम्यवादाकडे आकर्षित होतील अशी भीती अमेरिकेला वाटत होती. त्यामुळेच युरोपातील देशांना साम्यवादाकडे आकर्षित होण्यापासून रोखण्यासाठी अमेरिकेने मार्शल प्लॅन या योजनेची आखणी केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मार्शल प्लॅन ही योजना अमेरिकेच्या संसदेने म्हणजेच काँग्रेसने (अमेरिकेची संसद काँग्रेस म्हणून ओळखली जाते. अमेरिकेच्या काँग्रेसची दोन दालने असून वरिष्ठ दालनाला 'सिनेट' तर कनिष्ठ दालनाला 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज' असे म्हटले जाते.) मंजूर केली व ३ एप्रिल १९४८ रोजी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी त्यावर स्वाक्षरी केली व ही योजना म्हणजे एकप्रकारे कायदा राहिली. ज्या युरोपियन देशांना मार्शल योजनेचा आर्थिकदृष्ट्या फायदा झाला त्या देशांची नावे पुढील प्रमाणे आहेत- ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फ्रान्स, ग्रीस, आइसलँड, आयर्लंड, इटली, लक्झेमबोर्ग, नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, स्वीडन, स्वित्झर्लंड, तुर्कस्थान, युनायटेड किंग्डम व पश्चिम जर्मनी. एप्रिल १९४८ ते डिसेंबर १९५१ या जवळजवळ तीन वर्षांच्या कालावधीत अमेरिका मार्शल प्लॅनची अंमलबजावणी करत होती. या कालावधीत अमेरिकेने वर नमूद केलेल्या विविध युरोपियन देशांना १३ अब्ज डॉलर्स एवढी आर्थिक मदत केली. मार्शल योजना वा मार्शल प्लॅन म्हणजे निश्चितपणे जगाच्या इतिहासातील एक भव्यदिव्य अशी आर्थिक मदत देणारी योजना होती यात वाद नाही. अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जॉर्ज सी. मार्शल यांच्या नावावरून या योजनेला मार्शल प्लॅन असे संबोधले गेले. मार्शल हे २१ जानेवारी १९४७ पासून २० जानेवारी १९४९ पर्यंत अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री होते. जॉर्ज मार्शल यांनी ही योजना आखण्यात फार मोठा हातभार लावलेला होता. ज्या युरोपीय देशांना मार्शल प्लॅन योजनेअंतर्गत अमेरिकेची मदत मिळाली होती त्या देशांनी अमेरिकेला अपेक्षित असलेली आर्थिक प्रगती साध्य केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. 'पॉईंट फोर प्रोग्रॅम' या नावाखाली मार्शल योजनेला अभिप्रेत असणारी आर्थिक मदत तिसऱ्या जगतातील देशांना देखील देण्यात आली. या कार्यक्रमाला 'पॉईंट फॉर प्रोग्रॅम' असे म्हणण्याचे कारण म्हणजे हा मुद्दा ट्रुमन यांनी १९४९ सालात राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हातात घेताना केलेल्या भाषणात चौथ्या क्रमांकावर होता.

### सोविएत संघ व पूर्व युरोप यांच्यातील संबंध

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रशियन सैन्य पूर्व युरोपातील देशांमधून जर्मनीकडे कूच करत होते. रोमानिया, बल्गेरिया, अल्बेनिया, हंगेरी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया ही पूर्व युरोपातील काही देशांची नावे होत. यापैकी झेकोस्लोव्हाकिया या देशाचे विभाजन होऊ स्लोव्हेनिया व झेक रिपब्लिक हे दोन देश निर्माण झाले आहेत. एकेकाळी हे दोन देश मिळून झेकोस्लोव्हाकिया हा देश अस्तित्वात असल्याचे आपल्या निदर्शनास येते. पूर्व युरोपातील बरेचसे देश हिटलरने पादाक्रांत केले होते. अर्थात जर्मनीचा दुसऱ्या महायुद्धात पराभव झाल्यानंतर हे देश जर्मनीपासून मुक्त झाले. जर्मनी पासून मुक्त झाल्यानंतर या देशांना तेथे कुठल्या स्वरूपाचे शासन असावे याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असेल असे वाटत होते. परंतु ही आशा फोल ठरली. याचे कारण म्हणजे या देशांना जर्मनीचा पराभव करून स्वातंत्र्य मिळवून देण्यात सोविएत संघाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र सोविएत संघाने पूर्व युरोपातील पोलंड, झेकोस्लोव्हाकिया,

बल्गेरिया, रोमानिया, अल्बानिया, हंगेरी आदी देशांमध्ये साम्यवादी राजवटीची स्थापना केली.

अगदी जर्मनीचे देखील पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशा दोन देशांमध्ये विभाजन झाले. पूर्व जर्मनीमध्ये रशियाला,– सोविएत संघाला समर्थन करणारे साम्यवादी सरकार स्थापन झाले. वर नमूद केलेल्या पूर्व युरोपातील देशांमध्ये सोविएत संघाने साम्यवादी सरकारांची स्थापना केली होती. त्यामुळे पूर्व युरोपातील हे देश सूर्य संघाचे मित्रराष्ट्र तर होतेच परंतु त्यांच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणांमध्ये सोविएत संघ हस्तक्षेप करत असे; नव्हे तर या देशांचे जवळजवळ संपूर्ण नियंत्रण सोविएत संघाकडे होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तज्ज्ञांच्या मते सोविएत संघाला अमेरिकेने मार्शल प्लॅन वा इतर कुठल्याही योजनेअंतर्गत पूर्व युरोपीय देशांना देऊ केलेली आर्थिक मदत त्यांनी घेऊ नये असे वाटत होते. त्यामुळे सोविएत संघाने पूर्व युरोपातील साम्यवादी देशांसोबत व्यापार सहकारासाठी व एकमेकांना व्यापारीदृष्ट्या मदत करण्यासाठी मोलोटोव प्लॅन ही योजना आखली.

पूर्व युरोपातील जमिनीत राष्ट्रांचे परराष्ट्रीय आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी 'वर्सा पॅक्ट' (Warsaw Pact) नावाचा संरक्षण करार देखील करण्यात आला. वर्सा ही पूर्व युरोपातील पोलंड या देशाची राजधानी होय.

सुरुवातीच्या काळात जरी सोविएत संघाला पूर्ण प्रयत्न करून पूर्व युरोपातील देशांवर आपले नियंत्रण ठेवण्यात यश आले असले तरी कालांतराने पूर्व युरोपातील देश सोविएत संघाच्या प्रभुत्वा विरुद्ध कुरकुर करू लागले. उदाहरणच द्यावयाचे झाले तर युगोस्लाविया या पूर्व युरोपातील देशाचा साम्यवादी शासक मार्शल टिटो याने मॉस्कोचे म्हणजेच सोविएत संघाच्या नेत्यांचे आदेश पाळणे बंद केले वा झुगारून लावले. सोविएत संघाला अशी अपेक्षा होती की, युरोप पूर्व युरोपातील साम्यवादी देशांनी आपल्याच आदेशांचे पालन करावे व सोविएत नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे आपली ध्येय–धोरणे आखावीत व त्यांची अंमलबजावणी करावी. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतरचा काही काळ लोटून गेल्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे पूर्व युरोपातील साम्यवादी देशांनी हे अमान्य केले. मार्शल टिटोने युगोस्लावियात स्वतंत्र धोरणे राबविण्यास सुरुवात केल्यानंतर स्टॅलिनला त्याचा राग आला व त्याने टिटोला 'कॉमीनफॉर्म' मधून (Comminform- Communist Information Bureau) बाहेर काढले. 'कॉमीनफॉर्म'ची स्थापना पूर्व युरोपातील साम्यवादी देशांनी सोविएत संघाच्या आदेशांचे पालन करावे यासाठी करण्यात आली होती. स्टॅलिनने टिटो विरुद्ध अशाप्रकारची कारवाई केल्यानंतर देखील टिटोने आपली भूमिका व त्याला अभिप्रेत असलेली साम्यवादी विचारसरणी सोडली नाही वा तो मागे हटला नाही. टिटोने अशी ठाम भूमिका घेतली की, तो युगोस्लाव्हियामध्ये अशाच प्रकारचा साम्यवाद राबवेल की ज्यामुळे युगोस्लाव्हियाचा फायदा व विकास होईल. टिटोचे असे म्हणणे होते की, तो त्याच्या देशात स्टॅलीनने सोविएत संघासाठी विकसित केलेल्या साम्यवादी प्रणालीचे आंधळेपणाने अनुकरण करणार नाही. येथे एक बाब नमूद करणे आवश्यक आहे की, स्टालिनच्या मृत्यूनंतर ख्रुश्चेवला युगोस्लाव्हियाला भेट देऊन टिटोला शांत करावे लागले.

स्टॅलीन हयात असेपर्यंत पूर्व युरोपातील हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, अल्बानिया अशा देशांवर राज्य करणाऱ्या साम्यवादी शासकांना सोविएत संघाच्या आदेशांचे पालन न केल्यावर वा सोविएत संघाच्या विपरीत भूमिका घेतल्यावर शिक्षा दिली जात असे. स्टॅलीनच्या मृत्यूपश्चात निकिता ख्रुश्चेव हा साम्यवादी

सोविएत संघाचा सर्वेसर्वा बनल्यानंतर या धोरणात थोड्याफार प्रमाणात बदल झाला असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. ख्रुश्चेव पूर्व युरोपातील साम्यवादी देशांप्रती मवाळ धोरणाचा अवलंब करेल अशी अपेक्षा होती. युगोस्लावियाच्या बाबतीत ही गोष्ट खरी देखील ठरली. पोलंडच्या बाबतीत देखील सोविएत संघाला मवाळ भूमिका घ्यावी लागली. १९५६ साली सोविएत संघाने जरी आपले रणगाडे पोलंडमध्ये रवाना केले असले तरी त्यावेळी त्या देशाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली नाही. याउलट स्टॅलीनच्या काळात ज्या व्लाडियालॉ गोमुल्का (Wladialaw Gomulka) नामक पोलंडच्या साम्यवादी शासकाला तुरुंगात टाकण्यात आले होते त्याला पुन्हा एकदा पोलंडवर राज्य करण्याची अनुमती द्यावी लागली.

हंगेरीचे प्रकरण मात्र युगोस्लाव्हिया व पोलंड पेक्षा वेगळे होते. १९५३ सालात इम्री नॅगी (Imry Nagy) हा हंगेरीमध्ये सत्तेवर आला. नॅगीच्या अगोदर राकोसी (Rakosi) हा हंगेरीचा शासक होता व तो स्टॅलीनचा समर्थक होता. परंतु १९५५ साली राकोसी पुन्हा एकदा हंगेरीमध्ये सत्तेवर आला. १९५६ च्या ऑक्टोबर महिन्यात राकोसीच्या जुलमी राजवटीविरुद्ध लोकांनी बंड केले. १९५६ सालात हंगेरीत झालेल्या या घडामोडींना '१९५६ ची हंगेरीची क्रांती' असे म्हणतात. राकोसीला सत्ता सोडावी लागली. पुन्हा एकदा नॅगी हंगेरीमध्ये सत्तेवर आला. परंतु लवकरच ख्रुश्चेवचे असे मत झाले की, नॅगी हंगेरीमध्ये अशा प्रकारची ध्येय-धोरणे राबवीत आहे की, ज्यामुळे लवकरच हंगेरी हा देश सोविएत संघापासून व एकंदरीतच पूर्व युरोपातील साम्यवादी देशांच्या गटापासून दूर जाऊ शकतो. एवढेच नव्हे तर, नॅगी सोविएत संघाच्या नेत्यांचे नेतृत्व मान्य करण्यास उत्सुक नव्हता. नॅगी 'वर्सा ॲक्ट' या सोविएत संघाच्या नेतृत्वाखाली झालेल्या संरक्षण विषयक करारातून देखील बाहेर पडण्याची भाषा करत होता. हा करार अमेरिकेने केलेल्या 'नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन' या कराराला प्रत्युत्तर म्हणून करण्यात आला होता. वर्सा करारात पूर्व युरोपातील सोविएत संघाच्या नियंत्रणाखाली असलेले साम्यवादी देश सदस्य होते वा सहभागी होते. त्यामुळे नोव्हेंबर १९५६ मध्ये सोविएत संघाने हंगेरीमध्ये आपले सैन्य पाठवले व नॅगीला सत्यतून हटवले, एवढेच नव्हे तर, त्याला मृत्युदंड देण्यात आला. यानंतर सोविएत संघाच्या नेतृत्वाने हंगेरीमध्ये जॅनोस कदार (Janos Kadar) याला सत्तेवर बसवले. एकेकाळी याच कदारला स्टॅलीनच्या आदेशावरून तुरुंगात टाकण्यात आले होते.

पूर्व युरोपियन देशांनी १९४९ साली त्यांच्या साम्यवादी गटातील देशांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी 'काऊन्सिल फॉर म्युच्युअल इकॉनॉमिक असिस्टंस्' (Council for Mutual Economic Assistance- COMECON) ही संघटना स्थापना केली होती. ही संघटना म्हणजे एकप्रकारे अमेरिकेच्या 'मार्शल प्लॅन' या योजनेला दर्शविलेला विरोध होता. १९५६ साली ख्रुश्चेवने ही संघटना बरखास्त केली. या संघटनेची स्थापना स्टॅलीनने केली होती. यामागचा उद्देश असा होता की, 'पूर्व युरोपातील देशांनी सोविएत संघाने दिलेल्या आदेशांचे पालन करावे व सोविएत संघामध्ये अस्तित्वात असलेली साम्यवादी प्रणाली म्हणजेच योग्य व श्रेष्ठ साम्यवादी प्रणाली होय' असे मान्य करावे. ख्रुश्चेवने आपल्या कारकीर्दीत स्टॅलिनच्या तुलनेत बरेच उदार निर्णय घेतलेले निदर्शनास येते.

अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाची सुरुवात झाली. शीतयुद्धाचा काळ अतिशय अशांततेने भरलेला होता. या काळात प्रामुख्याने युरोपमध्ये व साधारणतः संपूर्ण जगामध्ये अनेक तणावपूर्ण घटना

(पृष्ठ क्र.२२ वर)

# शेक्सपियरच्या ४०४ व्या जन्मदिनानिमित्त

*इंग्रजी साहित्यातील प्रख्यात साहित्यकार विल्यम शेक्सपियर यांच्या वाङ्मयावर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

आज २३ एप्रिल जसा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा होतो; तसाच प्रख्यात इंग्रजी नाटककार 'विल्यम शेक्सपिअरचा जन्मदिन' म्हणून ही साजरा केला जातो. २३ एप्रिल १६१६ ते २३ एप्रिल २०२० हा ४०४ वर्षांचा काळ विल्यम शेक्सपियर जगभरातील साहित्यिकांचा एक अभ्यासाचा विषय म्हणून चर्चिला जातो.त्याच्या नाटकांची मोहिनी आजही भारतीय मनावर आहे. बॉलीवूडच्या 'मकबूल, ओंकारा, हैदर, रामलीला, इत्यादी चित्रपटांची कथावस्तू शेक्सपियरच्या नाटकांवर आधारित असून मराठीतील प्रसिद्ध 'नटसम्राट' हा चित्रपट शेक्सपिअरच्या 'किंग लियर' या नाटकावर आधारित आहे. त्याच्या सर्व नाटकांची जवळजवळ सर्व भारतीय भाषांत भाषांतरं झालेली आहेत. विशेषकरून मराठी रंगभूमीवर त्याच्या नाटकांचे अनेक प्रयोग सादर झाले. थोडक्यात; शेक्सपियर हा भारतीय जनमानसात बेमालूम मिसळला आहे.

ज्येष्ठ इंग्रजी कवी एझ्रा पाउंड यांनी साहित्याची व्याख्या करताना असं म्हटलं की Literature is a news which stays news अर्थात साहित्य म्हणजे नेहमी ताजं राहणारं. अनेक दिवस लोटले तरी साहित्य अजरामर राहातं. प्रख्यात इंग्रजी कवी जोन कीट्स म्हणतो

A thing of beauty is a joy for ever :

Its loveliness increases; it will never pass into nothingness;

अर्थात जे नित्यनूतन भासते व कधीही जुने होत नाही त्याला 'सौंदर्य' असे म्हणतात. असाच विचार ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी मध्ये जे 'नित्य नूतन जाणिजे। गीतातत्त्व'।। असं म्हटले आहे. कितीदाही वाचले तरी परत पुन्हा वाचावे वाटणे ही चांगल्या साहित्याची खरी ओळख. शेक्सपिअरच्या साहित्याचे असेच आहे.

नुकत्याच झालेल्या ब्रिटिश कौन्सिलच्या सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, भारतात शेक्सपियर इंग्लंडच्या तुलनेत जास्त अभ्यासला जातो. त्याची कारणे अनेक दिली जातात. भारतीय विद्यापीठाच्या कुठल्यातरी वर्षात शेक्सपियर शिकणे अनिवार्य असल्यामुळे कदाचित, किंवा इंग्रजांच्या वसाहतीकरण (Colonization) च्या मानसिकतेचे छुपे समर्थन शेक्सपियर करतो म्हणून असेल, मात्र त्याच्या लेखनाची बलस्थाने या निमित्ताने समोर येत असतात.

मागच्या वर्षी शेक्सपियरच्या जन्मगावी : Stratford Upon Avon येथे त्याच्या जन्मघरी ज्येष्ठ अभ्यासक डॉ. विजय बेडेकर यांच्या सोबत जाण्याचा योग विद्या प्रसारक मंडळाच्या इंग्लंड अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने आला होता. या जन्मगावी शेक्सपिअरचे यथोचित स्मारक करण्यात आले आहे. आजही त्याचे पैतृक घर 'शेक्सपियर बर्थप्लेस ट्रस्ट' नावाने मोठ्या दिमाखात उभे आहे. तो येथील हेन्ले रस्त्यावरील एका घरात जन्मला. १८४७ साली हे घर शेक्सपिअर-विश्वस्तांच्या स्वाधीन करण्यात आले. न्यू प्लेस या शेक्सपिअरच्या घराचा मात्र फक्त चौथरा शिल्लक आहे. शेजारच्या वस्तुसंग्रहालयात शेक्सपिअरशी संबंधित वस्तू ठेवल्या

आहेत. स्ट्रॅटफर्डच्या चर्चमध्ये त्याचे थडगे व अर्धाकृती पुतळा आहे. व्हन नदीच्या काठावर एक नाट्यगृह, ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय आहे. ग्रंथालयात शेक्सपिअरवरील दहा हजारांवर दुर्मीळ पुस्तके व हस्तलिखिते आहेत.जगभरातून साधारणत: ६ लाख पर्यटक या ठिकाणाला भेट देतात. आजही तेथे त्याच्या अनेक नाटकांचे प्रयोग नियमित होतात.

मी शेक्सपिअरच्या जन्मस्थळाला भेट दिल्यावर तयार केलेल्या एका सुंदर व्हिडीओची लिंक सोबत देत आहे. जिज्ञासूनी आवर्जून पहावी. https://www.youtube.com/watch?v=dq8p NyQh7mct=81s

करोना लॉकडाऊनच्या काळात ग्लोब थिएटरने तेथील सादर होणाऱ्या नाटकांचे थेट प्रक्षेपण युट्युब वरून जगभरातील शेक्सपियर प्रेमींसाठी विनामूल्य होत आहे. कालच त्याच्या रोमियो व ज्युलियट या नाटकाचे लंडन येथील प्रसिद्ध ग्लोन थिएटर मधून थेट प्रक्षेपण झाले. जिज्ञासू प्रेक्षकांसाठी ती लिंक सोबत देत आहे. (https://www.youtube.com/watch?v=eS-IPJ0FGš0)

शेक्सपिअरच्या नाटकांच्या छापील आवृत्त्यांबाबत गोंधळाची परिस्थिती आहे. शेक्सपिअरच्या नाटकांची एकत्र संपादित आवृत्ती (फर्स्ट फोलिओ) जॉन हेमिंग व हेन्री काँडेल यांनी १६२३ मध्ये प्रसिद्ध केली. त्यांतील छत्तीसपैकी अठरा नाटके प्रथमच छापली गेली. इतर अठरा अगोदर वेगवेगळी (क्वार्टो आवृत्त्या) छापून प्रसिद्ध झाली होती व त्यांची कायदेशीर नोंदही झाली होती. फर्स्ट फोलिओत 'पेरिक्लीझ' हे नाटक नाही. काही नाटकांच्या फोलिओ व क्वार्टो आवृत्त्यांतील संहितेत कमालीचा फरक दिसतो. काही क्वार्टो आवृत्त्यांतील संहिता तर भ्रष्ट स्वरूपात आहेत. ही नाटके कुणीतरी नाट्यप्रयोग पाहताना किंवा नंतर स्मरणातून लिहून काढली असा तर्क आहे. या आवृत्त्या विनापरवाना छापल्या असाव्यात असेही म्हणतात. असे प्रकार त्या काळी सर्रास चालत.

शेक्सपिअरवर इतक्या विविध दृष्टिकोनांतून लिहिले गेले आहे की, त्यामुळे समीक्षेच्या कक्षाच विस्तारल्या आहेत. प्रत्येक शतकाने आपापल्या अभिरुचीप्रमाणे शेक्सपिअरचा अभ्यास केला आहे. त्याच्यातील कलात्मकतेच्या व प्रतिभेवरील हुकमतीच्या अभावाचे दिग्दर्शन करूनही त्याचा समकालीन बेन जॉन्सन त्याला अभिजात ग्रीक नाटककारांच्या पंक्तीत बसवतो. जॉन मिल्टन व जॉन ड्रायनने (सतरावे शतक) त्याच्या निसर्गदत्त प्रतिभेचा गौरव केला व या प्रतिभेच्या दीप्तीने आपल्या ठायी असलेल्या व्युत्पन्न विद्वत्तेच्या अभावाची जाणीव त्यास होऊन दिली नाही, असे म्हटले. शेक्सपिअरच्या शिक्षणाचा ऊहापोह करणारी पुस्तकेही प्रसिद्ध झाली. अठराव्या शतकात शेक्सपिअर व त्याचे समकालीन यांच्याविषयी माहिती गोळा करण्यात आली. शेक्सपिअरच्या नाटकांतील उणिवा व दोषस्थळांची यादी करण्यात आली. शेक्सपिअर खंडाच्या आपल्या विद्वत्तापूर्ण व विवेचक प्रस्तावनेत डॉ. जॉन्सन शेक्सपिअर बद्दल गौरवोद्गार काढतो, पण त्याच्याविषयी न्यायाधीशाचीच भूमिका घेतो. शेक्सपिअरने योजिलेल्या प्रतिमांच्या आधारे त्याच्या सर्जनशील प्रतिभेचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न अठराव्या शतकापासून आजतागायत चालू आहे. शेक्सपिअरच्या नाटकांतील व्यक्तिरेखांचा अभ्यास अठराव्या शतकाच्या मध्यापासूनच सुरू झाला. शेक्सपिअरच्या पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण अत्यंत एकसंध रीतीने होते. त्याच्या नाटकातले व्यक्तिचित्रण म्हणजे सतत विकसित होत असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे केवळ अल्पसे दर्शन वाटावे इतकी त्या व्यक्तिचित्रात सूचकता असते.

शेक्सपियरवर अनेक अभ्यासकांनी अत्यंत सुंदर

समीक्षा केली आहे. हा एका अजून वेगळ्या लेखाचा विषय होईल. मात्र इंग्रजीची पहिली डिक्शनरी तयार करणारा म्हणून प्रसिद्ध असलेला प्रख्यात समीक्षक डॉ. सम्युअल जॉन्सन आपल्या प्रीफेस टू शेक्सपियर या महत्त्वपूर्ण निबंधात म्हणतो की,

Shakespeare is above all writers, at least above all modern writers, the poet of nature; the poet that holds up to his readers a faithful mirrour of manners and of life. His characters are not modified by the customs of particular places, unpractised by the rest of the world; by the peculiarities of studies or professions, which can operate but upon small numbers; or by the accidents of transient fashions or temporary opinions: they are the genuine progeny of common humanity, such as the world will always supply, and observation will always find. His persons act and speak by the influence of those general passions and principles by which all minds are agitated, and the whole system of life is continued in motion. In the writings of other poets a character is too often an individual; in those of Shakespeare it is commonly a species.

वरील डॉ. जोन्सन यांच्या उद्धरणाचा साकल्याने अभ्यास केला असता असे दिसते की, शेक्सपिअरला मानवी मनाची उकल झाली होती. त्याची पात्रे जरी इंग्लिश मध्ये बोलणारी व पाश्च्यात्य धाटणीची असली तरी मानवी भावना अस्सल होत्या. शेक्सपिअरने तत्कालीन उपलब्ध असलेले नाट्य-अभिनयाचे कुठलेही विद्यापीठीय शिक्षण न घेता तत्कालीन ब्रिटिश रसिक मनांवर जे अधिराज्य गाजवले ते अतुलनीय आहे. शेक्सपिअरच्या समकालीन नाटककारांत प्रसिद्ध असलेले क्रिस्तोफर मारलो इत्यादी 'युनिव्हर्सिटी विटस्'नी शेक्सपिअरवर टीका केली आहे. त्यांचे म्हणणे असे होते की, शेक्सपिअरने नाटकाचे कुठलेही अधिकृत डिग्री व शिक्षण न घेता त्याची नाटकं इतकी प्रसिद्ध का होतात? रोबर्ट ग्रीन या शेक्सपिअरच्या समकालीन लेखकाने तर त्याच्यावर "anupstart Crow, beautified with our feathers", अशी टीका केली.

इंग्लंडमध्ये १५९२ ते १५९४ पर्यंत प्लेगमुळे नाट्यगृहे बंद होती. या काळात शेक्सपिअरने 'व्हीनस अँड अडोनिस व द रेप ऑफ ल्यूक्रीझ' ही नितांत सुंदर काव्ये लिहिली. तो इटली, डेन्मार्क व जर्मनीलाही जाऊन आला असा तर्क आहे. १५९४ मध्ये नाट्यगृहे परत सुरू झाली. या वर्षापासून शेक्सपिअरचे नाव सतत अग्रभागी दिसते. तो लॉर्ड चेंबरलिन्स मेन या नाटकमंडळीत होता. ह्याच मंडळीचे पुढे 'किंग्ज मेन' असे नाव पडले. या मंडळींसाठी शेक्सपिअरने १५९४ ते १६०३ या काळात दरवर्षाला दोन याप्रमाणे नाटके लिहिली. या नाटकांचे प्रयोग लंडनमधील निरनिराळ्या नाट्यगृहांत झाले.

मराठी विश्वकोशाच्या नोंदीनुसार विल्यम शेक्सपिअरच्या नाटकांचे चार प्रकार आहेत : ऐतिहासिक, सुखात्मिका, शोकात्मिका व सुखदुःखांचे मिश्रण असणारे रोमान्सेस. सुरुवातीस शेक्सपिअरने हे बहुतेक प्रकार कसे काय जमतात, हेच जणू पाहिल्यासारखे वाटते. हेन्री द सिक्स्थ- ३ भाग(१५९०-९२) हे ऐतिहासिक नाटक. टायटस अँड्रॉनिकस (१५९३) हा खून व भीषण रक्तपाताने रंजित असा त्यावेळचा लोकप्रिय नाट्यप्रकार. द कॉमेडी ऑफ एरर्स (१५९०) हे प्लॉटसही विख्यात रोमन सुखात्मिकाकाराच्या 'मेनीकमी' ह्या सुखात्मिकेचे इंग्रजी रूपांतर. रिचर्ड द थर्ड (१५९२-९३) ही दारुण शोकात्मिका. द टेमिंग ऑफ द श्रू (१५९४) हा अदभुतरम्य फार्स किंवा प्रहसन. या सर्व नाट्यप्रकारांच्या हाताळणीत शेक्सपिअरचे खास वेगळेपण व कौशल्य जाणवते व त्याने रॉबर्ट ग्रीन ह्या ज्येष्ठ नाटककाराचा मत्सर का जागृत केला हेही समजते! आपल्या सर्व नाटकांची सामग्री शेक्सपिअरने लोकांना अगोदरच माहीत असलेल्या साहित्यातून निवडली आणि या परिचित

कथावस्तूंना आपल्या दिव्य प्रतिभेने अभिनव सर्जनशील असे रूप प्राप्त करून दिले.

ऐतिहासिक नाटकांत शेक्सपिअरने इंग्लंडचा इतिहास उभा करून लँकेस्टर व यॉर्क घराण्यांची भांडणे व त्यांच्यातील यादवी युद्ध यांचे दुष्परिणाम सूचित केले. तसेच राष्ट्रीय ऐक्याचे महत्त्व व आदर्श राजाची प्रतिमा ह्यांचे कलात्मक दर्शन घडविले. त्याच्या ऐतिहासिक नाटकांत इंग्लंडचे बहुतेक ट्यूडर राजे आलेले आहेत. उदा. चौथा, पाचवा, सहावा हेन्री; दुसरा, तिसरा रिचर्ड जॉन राजा, तिसरा रिचर्ड, पाचवा हेन्री ही त्यांची काही अमर व्यक्तिचित्रे. त्यांतून शेक्सपिअरचे मानवी मनाचे सखोल व सूक्ष्म ज्ञान व निरीक्षण प्रत्ययास येते. पश्चिमी प्रबोधनकाळात जाज्वल्य राष्ट्रप्रेमाची भावना नव्यानेच सर्व युरोपीय देशांत निर्माण झाली. शेक्सपिअरने इंग्लंडच्या राष्ट्रप्रेमाचा आपल्या नाटकांतून परिपोष केला.

द टू जंटलमेन ऑफ व्हेरोना(१५९४),लव्हज लेबर्स लॉस्ट (१५९४), मिडसमर नाइट्स ड्रीम(१५९६), द मर्चंट ऑफ व्हेनिस(१५९६), मच अडू अबाउट नथिंग(१५९८), ज यू लाइक इट(१५९९), ट्वेल्फ्थ नाइट(१५९९) या सुखात्मिकांतून शेक्सपिअरच्या असामान्य प्रतिभेने नाट्यकलेचे सर्व पैलू उजळून काढले. त्यांत मानवी जीवनाचे चौफेर, सूक्ष्म व सावध निरीक्षण आहे. त्यांत खोचक, बोचक तसेच खळाळून हसविणाऱ्या अव्वल दर्जाच्या विनोदाची कारंजी आहेत. असंख्य संस्मरणीय व्यक्तिरेखा आहेत. उदा. शायलॉक, माल्व्होलिओ इत्यादी. रमणीय, बुद्धिमान व जीवनाकडे टवटवीत मनाने पाहणाऱ्या नायिकांचे या सुखात्मिकांत वर्चस्व दिसते. त्यात स्वर्गीय प्रेमभावनेची तरफदारी व कृत्रिम भावनाविवशतेची गोड थट्टाही आहे. डॉगबेरी, व्हर्जेस, विदूषक अशी अनेक विनोदी पात्रे अतिसहजपणे कथावस्तूचा अविभाज्य भाग म्हणून निर्माण करण्यात आली आहेत.

ह्या सुखात्मिकांची संविधानके अनेक गोष्टी, कथा, हकीकती वगैरेंच्या बेमालूम मिश्रणातून तयार झाली आहेत. त्यांतील रचनाकौशल्याने मन स्तिमित होते. घटनांचा क्रम व संगती प्रत्यक्ष जीवनात असावी इतक्या सहजपणे साधण्यात आली आहे आणि नाटकांच्या संदर्भातही त्यांना तितकीच सहज अपरिहार्यता प्राप्त करून दिली आहे. अव्वल दर्जाचे काव्य, समृद्ध भाषा, नवे शब्द व वाक्प्रचार, गेय गीते यांची या सुखात्मिकांत लयलूट आहे. जीवनाचा भाष्यकार शेक्सपिअर या सुखात्मिकांच्या कालखंडात जीवनाकडे प्रसन्न, आशावादी व ध्येयदृष्टीने पाहत आहे हे जाणवते.

रिचर्ड द थर्ड व रोमिओ अँड ज्यूलिएट (१५९७) ह्या नाटकांपासून शेक्सपिअरने शोकात्म नाटके लिहिण्यास सुरुवात केली. इ. स. १५९९ ते १६०६ या काळात त्याने जगप्रसिद्ध शोकात्मिका लिहिल्या. उदा. ज्यूलिअस सीझर (१५९९), हॅम्लेट (१६००), ऑथेल्लो (१६०३), किंग लीअर (१६०५), मॅकबेथ (१६०६), अँटनी अँड क्लीओपात्रा (१६०७), टायमन ऑफ अथेन्स (१६०५-०८). यांचा अभ्यास गेली तीनशे वर्षे सतत चालू आहे. यांतील प्रत्येक शोकात्मिका वेगवेगळ्या कारणांसाठी श्रेष्ठ आहे. प्रत्येकीने मानवी जीवनातील गूढ गोष्टींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व शोकात्मिका एकाच कालखंडात व सुखात्मिकांचा नजराणा प्रेक्षकांना दिल्यानंतर लिहिल्या गेल्या, ही गोष्ट अभ्यासकांना फार अर्थपूर्ण वाटते. या शोकात्मिकांतून खुद्द शेक्सपिअरच्या भावनिक व मानसिक संघर्षाचे प्रतिबिंब पाहण्याचा प्रयत्न नित्य चालू आहे.

मानवी जीवनातील दुःखे नेमकी कशामुळे निर्माण होतात? ग्रीक दृष्टिकोनाप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला दुःखच येणे ही त्या व्यक्तीची नियती असते. तसेच; केवळ योगायोगाने जीवनात दारुण घटना घडतात हेही दिसून येते. पण व्यक्ती हीच आपल्या विशिष्ट

विश्रांती देणारे एकमेव औषध म्हणजे झोप.

स्वभावामुळे स्वतःच्या दुःखांना कितपत जबाबदार धरता येईल, असा गहन प्रश्न शेक्सपिअरने उपस्थित केला. स्वभावातील एखादी उणीव हीच व्यक्तीच्या दारुण शोकात्म जीवनास कारणीभूत होते हे हॅम्लेट, लीअर, ऑथेल्लो इत्यादींच्या चित्रणातून शेक्सपिअरने दाखवून दिले. फारसा अभिनिवेश न बाळगता व्यक्तीच्या दुःखमय जीवनास थोडी नियती, थोडा योगायोग, थोडाफार त्या व्यक्तीचा विशिष्ट स्वभाव इ. कारणीभूत होतात असे तो सुचवितो. या व्यक्तीच्या जीवनातील प्रत्यक्ष संघर्षापेक्षाही व्यापक स्वरूपाचा तिचा अंतःसंघर्ष चालू असतो वा तो शिव व अशिव यांतील संघर्ष असतो. या संघर्षांतून शेवटी चांगलेच निर्माण होते; परंतु ते चांगल्या गोष्टींच्या विनाशाची जबर किंमत देऊनच, असेही शेक्सपिअरने सूचित केले आहे. पण एकंदरीने जीवन हे एक अनाकलनीय गूढ आहे हेच जाणवत राहते. अँड्रू सिसिल ब्रॅडलीने या दृष्टिकोनातून शेक्सपिअरच्या शोकात्मिकांचा तपशीलवार अभ्यास केला.

प्रमाद, दुःख आणि पाप यांचे कडू जहर या शोकात्मिकांना झाकोळून टाकते. त्यांतील दैवाचा खेळ क्रूर आहे. उदा. ऑफेलिया, डेस्डेमोना, कॉर्डेलिया यांसारख्या निष्पाप नायिकांचा बळी. मानवी जीवन म्हणजे केवळ क्रौर्य व राक्षसीपणा. त्यात सद्-गुणांचा विजय व दुर्गुणांचा पराजय वगैरे काही नाही, असे या शोकात्मिकांतून सुचविले आहे. या भीषण जीवनदर्शनाची छाया या काळातल्या ट्रॉइलस अँड क्रेसिडा (१६०२), ऑल्स वेल डेटा एंड्स वेल (१६०२), मेझर फॉर मेझर (१६०४) या सुख शोकमिश्रित नाटकांवरही (रोमान्सेस) पडली आहे.

जगविख्यात व्यक्तिचित्रे (हॅम्लेट, इआगो, लीअर), सखोल तत्त्वज्ञान (हॅम्लेटची स्वगते, लीअर व त्याच्या विदूषकाची जीवनावरील भाष्ये), दर्जेदार काव्य, मानवी जीवनातल्या सर्व रहस्यांचे अमोघ भाषेत अनावरण, परिचित कथासामग्रीवरील दिव्य प्रतिभेचे संस्करण, ही शेक्सपिअरच्या शोकात्मिकेची वैशिष्ट्ये होत.

शेक्सपिअरच्या शेवटच्या कालखंडातील नाटके म्हणजे पेरिक्लीझ (१६०८), सिंबेलाइन (१६०९), द विंटर्स टेल (१६१०), वटेंपेस्ट (१६११). या काळात शेक्सपिअर स्ट्रॅटफर्डला स्थायिक झाला होता. त्याला भरपूर लोकप्रियता, कौटुंबिक स्वास्थ्य व ऐश्वर्य मिळाले होते. त्याचा प्रभाव या नाटकांवर पडला आहे असे मत मांडले गेले आहे. ह्या नाटकांची रचना काहीशी सैल आहे. त्यांत जादू, चमत्कार, असंभाव्य घटना, सुख-दुःखांचे मिश्रण, संगीतिकेतील दृश्यकाव्य व संगीत यांचे एक विलक्षण रसायन झालेले दिसते. त्यांतून शेक्सपिअरच्या वृत्तीतील स्थिरता प्रत्ययाला येते. झाले गेले विसरून उदार अंतःकरणाने क्षमाशील बनणे हाच जीवनातील सर्वश्रेष्ठ गुणविशेष आहे, हेही त्यांतून सूचित झाले आहे.

मात्र तरीही शेक्सपिअरला जी प्रसिद्धी व मान-मरातब मिळाला तो त्याच्या समकालीन कोणाही नाटककाराला मिळाला नाही हे तितकेच खरे. याचे कारण होते ते म्हणजे शेक्सपिअरला श्रोत्यांना नेमके काय हवे आहे ते देण्याची कला व जाण. शेक्सपिअरच्या सर्व शोकांतिकां मध्ये शेवटी सर्व पात्रे एकमेकांना मारून टाकतात. रंगमंचावर खूप रक्तपात होतो.

प्रख्यात ग्रीक तत्त्वज्ञ आरीस्टोटल याने आपल्या पोएटीक्स या ग्रंथात स्पष्ट म्हटले आहे की, रंगमंचावर रक्तपात दाखवू नये. तरीही शेक्सपिअर रक्तपात दाखवतो याचे कारण तत्कालीन ब्रिटिश मानसिकतेत होते. तत्कालीन म्हणजे १६ व्या शतकातील इंग्रजी समाज हा अशिक्षित होता व रक्तपिपासू वृत्तीचा होता. रंगमंचावर रक्त सांडलेले पाहून त्यांची बदल्याची भावना जागृत

जीवनातील यश हे खूप कष्टाने मिळते.

होत असे व दुष्टाला शिक्षा झाली या आविर्भावात त्यांना हलके वाटत होते. शेक्सपिअरने या तत्कालीन प्रेक्षकांच्या मनाचा विचार करून आपल्या शोकान्तिका लिहिल्या.

म्हणजे शेक्सपिअर ज्या १६ व्या शतकात अत्यंत क्रूर व अनागर ब्रिटिश प्रेक्षकांसाठी लिहित होता त्या काळात 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले' असा उद्घोष संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी नावाचा अजोड ग्रंथ लिहून ४०० वर्षे झाली होती. संत एकनाथांचे अवतार कार्य व ग्रंथलेखन कार्य पार पडले होते. संत तुकाराम हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत सांस्कृतिक योगदान देत होते. याच काळात इंग्लंडमध्ये शेक्सपिअर नाटकं लिहीत होता. मराठीचे ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांनी शेक्सपिअर व तुकाराम महाराज यांच्या समकालीनत्वाचा उल्लेख करत एक सुंदर कविता लिहिली. ती आजही तेवढीच रसरशीत वाटते.

तुकोबांच्या भेटी । शेक्सपिअर आला ।।
तो झाला सोहळा। दुकानात.
जाहली दोघांची । उराउरी भेट
उरातले थेट । उरामध्ये
तुका म्हणे, ''विल्या। तुझे कर्म थोर;
अवघाची संसार । उभा केला।।''
शेक्सपीअर म्हणे । ''एक ते राहिले; ।
तुका जे पाहिले विटेवरी.''
तुका म्हणे, ''बाबा ते त्वां बरे केले,
त्याने तडे गेले। संसाराला;
विठ्ठल अट्टल, । त्याची रीत न्यारी
माझी पाटी कोरी । लिहोनिया.''
शेक्सपीअर म्हणे । ''तुझ्या शब्दांमुळे
मातीत खेळले । शब्दातीत''
तुका म्हणे, ''गड्या । वृथा शब्दपीट
प्रत्येकाची वाट । वेगळाली
वेगळिये वाटे । वेगळिये काटे;
काट्यासंगे भेटे । पुन्हा तोच.
ऐक ऐक वाजे । घंटा ही मंदिरी।
कजागीण घरी । वाट पाहे.''
दोघे निघोनिया । गेले दोन दिशां
कवतिक आकाशा । आवरेना ।

या कवितेत शेक्सपिअर तुकारामांना भेटायला त्यांच्या दुकानात देहूत येतो. त्यांची उराउरी भेट होते व जीवनाबद्दल चर्चा होते. तुकाराम महाराज शेक्सपिअर च्या नाटकांची व त्यातून त्याने उभ्या केलेल्या संसाराचे कौतुक करतात. मात्र शेक्सपिअर तुकोबांना म्हणतो की, 'तुम्ही हे विटेवर सावळं परब्रह्म पांडुरंगाच्या रूपाने पाहिले ते मला जमले नाही.' शेक्सपिअरच्या साहित्याचा भारतीय परिप्रेक्ष्यात विचार केला असता विंदा करंदीकरांनी या कवितेत उभ्या केलेल्या विचारव्युहाशी आपण सहमत होतो.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# केसरीमधील संस्कृत व मराठी वचने

*केसरीमधील संस्कृत व मराठी वचने याचा उहापोह या लेखात केला आहे - संपादक*

लोकमान्य टिळक १८७३ ते १८७७ या काळात गोपाळ गणेश आगरकर व वामन शिवराम आपटे यांच्या बरोबर डेक्कन कॉलेज मध्ये एकत्र शिकत होते. त्यांची खोली प्रा. मधुकर श्रीपाद माटे यांनी शोधून काढली. तिथे त्याबद्दल पाटी आहे. पुढे त्यांनी १८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूलची व १८८५ मध्ये फर्गसन कॉलेजची स्थापना केली. त्या दरम्यान त्यांनी केसरी वर्तमान पत्र सुरू केले. त्यांनी केसरी संस्कृत आणि मराठी मध्ये वचने छापली. ती अशी......

''स्थितिं नो रे दृध्या: क्षणमपि मदान्धेक्षण सखे ।
गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वन भुमि ।।
असौ कुम्भि भ्रान्त्या खरनखर विद्रावितमहागिरिग्रावग्राम :
स्वपिति गिरिगर्भे हरिपति: ।।''
''गजालि श्रेष्ठाया निबिडतर कांतार गुहरी ।
मदांधाक्षामित्रा क्षणभरी हि वास्तव्य न करी ।।
नखाग्राने जेथे गुरुतरशिला भेदुनि करि-भ्रमाने
आहे रे गिरिकुहरि हा निद्रित हरी ।।''

केसरी वर्तमानपत्र सुरू करताना लोकमान्य टिळकांनी हे दोन्ही श्लोक आंग्ल शासनाला उद्देशून हेतुपुरस्सर स्वत: रचले असावेत. 'सखे' आणि 'मित्रा' ही दोन्ही संबोधने उपरोधिक आहेत. 'वास्तव्य न करी' ह्याचा सरळ अर्थ, 'आपण आपला गाशा गुंडाळावा' असा आहे. ज्यावेळी इंग्रजी सत्तेचे स्थान बळकट झाले होते त्या काळात लोकमान्य टिळकांनी देशबांधवांच्यावतीने सरकारला चेतावणी दिली आहे. त्या वेळचे सुशिक्षित व अशिक्षित हे दोन्ही समाज निद्रीत अवस्थेतच होते. तरीदेखील तो समाज जर जागा झाला तर हत्तीप्रमाणे मदमस्त होऊन बिनधास्तपणे अरण्यात भटकणाऱ्या हत्तीची, जागा झालेल्या सिंहाची डरकाळी ऐकून जी अवस्था होते ती इंग्रज सरकारची होईल हा या केसरी तील ब्रीदवाक्याचा अर्थ आहे. 'पडेल ते पदरात घ्या' असे धोरण त्यांनी ठेवले होते. वाटाघाटीसाठी ते इंग्लंडला देखील गेले होते. त्यांनी सार्वजनिक गणेश उत्सव समाजाला जागे करण्यासाठीच सुरू केला. तळागाळाच्या लोकांपर्यंत पोहोचून त्यांनी 'तेल्या तांबोळ्यांचे पुढारी' असे बिरूद धारण केले होते. लाल, बाल आणि पाल या तिघांनी संपूर्ण भारताचे त्या काळी नेतृत्व केले. लाल म्हणजे लाला लजपतराय पंजाबी पुढारी, पाल म्हणजे बिपिनचंद्र पाल बंगाली पुढारी आणि बाल म्हणजे बाळ गंगाधर टिळक. हे सर्व राजकारण करीत असताना त्याची बीजे त्यांच्या विद्यार्थी दशेत पेरली गेली. असे म्हणतात की, टिळक, आगरकर, विद्यार्थीदशेतसुद्धा 'राजकारण की समाजकारण' यावर वादविवाद करीत. आपटे त्यांना त्यावेळी म्हणत की, 'तुम्ही भांडत बसा, मला मात्र विद्याकारण श्रेष्ठ वाटते. कारण आपण अभ्यास केला नाही तर परीक्षा कशी उत्तीर्ण होणार?' असे म्हणतात की, केसरी वर्तमानपत्र सुरू केल्यानंतर त्यांनी टिळकांना सांगितले की, शिक्षण संस्थेपासून तुम्ही वेगळे व्हा. त्या नंतर टिळकांचा राजकारणातील प्रवास सर्वश्रुत आहे.

गीता रहस्य आणि ओरायन असे विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिणाऱ्या लोकमान्य टिळकांची विद्वत्ता देखील साक्षेपी

(पृष्ठ क्र.४० वर)

# पिळुकी / पेवरवेल

*'पिळूकी / पेवरवेल' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, पाऊस आता विश्रांती घेतोय. वातावरण स्वच्छ आहे. आकाशात अजूनही ढग रेंगाळलेले आहेत. थोड्याच दिवसात हेच ढग विविध रंगांने रंगलेले दिसतील. निळ्याशार आकाशाच्या पार्श्वभूमीवर पांढरे चकचकीत कड असणारे पांढरे शुभ्र ढग व त्यांच्या विविध आकृत्यांमधून वेगवेगळ्या आकाराचे होणारे भास. हा साराच दृष्टीला सतत नावीन्य पुरविणारा व तजेला देणारा भाग. डोंगर-दऱ्यांमध्ये विविध रंगांच्या फुलांनी सृष्टीला सजवायला सुरुवात केली आहे. खरा निसर्गप्रेमी अशा दिवसात घरी बसून रहाणे शक्यच नाही. सॅक पाठीशी बांधून तो बाहेर पडतो. निसर्गाने आपला खजिना पसरूनच ठेवला आहे. 'याऽऽ या. मनसोक्त सौंदर्य लुटा, अन् ते डोळ्यात साठवून ठेवा' म्हणून निसर्ग आवाहन करीत असतो. हा खजिना फक्त पाहण्यासाठी आहे. ओरबाडून नेण्यासाठी नाही याची मात्र आपणास जाणीव ठेवावयाची असते.



असाच डोंगरमाथ्यावर फिरत असताना, एका झुडुपावर लालसर रंगाची फुले फुललेली दिसली. आजपर्यंत पाहिलेल्या फुलांपेक्षा ही फुलं वेगळी होती. पाय नकळत त्या झुडुपाकडे ओढले गेले. हळूहळू झुडुपाकडे जात होतो. प्रत्येक पावलागणिक जवळ जाताना त्या फुलांमधील वेगळेपणा डोळ्यांत भरत होता. जेव्हा अगदी जवळ पोहोचलो तेव्हा कळले की, ही फुले नसून त्या झाडाची फळे होती आणि ते झाड नव्हते तर वेली सदृश्य एक झुडूप होते.

लाल तपकिरी रंगाची ही फळं चक्क ऐन किंवा अर्जुन यांच्या फळासारखी दिसणारी. पण चार पंखांचा आकार देखील ऐन, अर्जुनाच्या फळांपेक्षा मोठा. पण तशीच झुबक्यात येणारी. वाळलेली फळे सोसाट्याच्या वाऱ्यासंगे सहज उडून कितीतरी लांब जाऊन पडणारी. ती भिरभिरत जेव्हा जमिनीवर येतात तेव्हा देखील वेगळं सौंदर्य बहाल करतात. ही फळं आहेत पिळुकीची.

पिळुकी एक झुडूप वर्गीय झाड. त्याची रचना वेलीच्या जास्त जवळची. उंची २ ते ३ मीटर. भारतीय उपखंडातील मूळ निवासी. पानांची रचना लंबगोलाकृती, शेंड्यावर टोकेरी लांबी ८ ते १० से. मी., रुंदी ५ ते ६

से. मी. व साधी. रंग पोपटी हिरवा. या झाडाला फेब्रुवारी–मार्च महिन्यात मंजिऱ्यांच्या आकारातील फुले येतात. एक मंजिरी अनेक लहान लहान फुलांनी भरलेली असते. या मंजिरीवर छोट्या पेल्याच्या आकाराची साधारण अर्धासेंटीमीटर व्यासाची फुले येतात. रंग पिवळा–पोपटी. पाकळ्या मागे वळलेल्या व पाकळ्यां जवळ डोक्यावर टोपी घातलेले अनेक पुंकेसर एखाद्या राजाच्या मुकूटासारखे दिसणारे. या फुलांचा आकार अगदी लहान असल्याने ती दुरून दिसत नाहीत. झाडावर असलेल्या मंजिऱ्या तेवढ्या नजरेला पडतात. मार्च ते मे महिन्यात या झुडुपावर लाल चुटूक रंगाची फळे आकार घेऊ लागतात आणि आतापर्यंत इतर झाडांच्या हिरवाईत लुप्त झालेले हे झुडूप या लाल रंगामुळे चटकन नजरेत भरते. ऐनाची व अर्जुनाची फळे हिरव्या पोपटी रंगाची, तर ही फळे संपूर्ण लाल रंगाची. ही फुले वाळल्यानंतर थोडी तपकिरी रंगाची होतात. तथापि वाळली तरी त्यांचे सौंदर्य कायम असते.

या झाडाच्या औषधी गुणधर्माबाबत फारसी माहिती नसली तरी जंगली हत्तींचे ते आवडते खाद्य आहे. काही फुलपाखरांच्या अळ्या फक्त याच झाडांच्या पानांवर जगतात. या झाडांच्या फांद्यांपासून उत्तम प्रतीचे धागे मिळतात. त्यापासून दोर तयार होतो. तसेच; फांद्याची टोके ठेचून त्यापासून ब्रश बनवितात. हे ब्रश घरगुती सफाई कामासाठी वापरतात.

Combretum albidum या शास्त्रीय नावाने ओळखले जाणारे हे झुडूप जंगलातील सौंदर्य वाढवित असले तरी ते शहरांतून व उद्यानांतून मुळीच दिसत नाही. यामध्ये असलेल्या औषधी गुणाबद्दल वेगवेगळ्या स्तरावर संशोधन चालू आहे. अजूनतरी खूप समाधानकारक निष्कर्ष हाती आले नाहीत. डोंगर उतारावर किंवा पाणवठ्याच्या काठी कधीकाळी याची गाठ पडते. एकदा याची ओळख झाली की मात्र ते कायम स्मरणात राहील. काही वन्य जमाती या झाडाचा औषधोपचारासाठी वापर करतात. केरळमधील मंजाकोडी आदिवासी हे या झाडाच्या सालीचा रस काविळीसाठी देतात. Punicalagin सारखे antioxidants या झाडापासून मिळतात. पण प्रमाण कमी आहे. अजूनही यावर काही संस्था काम करीत आहेत.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

●●●

(पृष्ठ क्र. १३ वरून - **शीतयुद्धाच्या दरम्यान झालेले तंटे व वाद**)

घडत होत्या. यातील काही प्रमुख घटना म्हणजे जर्मनीचे पूर्व व पश्चिम जर्मनीत झालेले विभाजन, १९५० चे कोरियाचे युद्ध व क्युबामधील क्षेपणास्त्र पेचप्रसंग या होत. या सर्व स्फोटक घटनांमुळे अमेरिका व सोविएत संघ या दोन महासत्तांमध्ये आण्विक युद्ध होईल की काय अशी भीती निर्माण झाली होती. परंतु सुदैवाने या दोन्ही देशांनी प्रगल्भता दाखविल्यामुळे मोठे युद्ध होणे टळले!

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

●●●

जो बदलत नाही तो असमंजस असतो.

# संगीत मनमोही रे
## भाग २ : सप्तसूर आणि राग

*'संगीत मनमोही रे' या संगीत विषयीच्या लेखमालेतील 'सप्तसूर आणि राग' हा दुसरा भाग – संपादक*

''सा रे ग म प ध नि'' या सात ''शुद्ध स्वरांचं स्पतक'', ''रे ग ध नि'' हे चार ''कोमल स्वर'' आणि 'म' हा एकटाच 'तीव्र स्वर' यातून बनतं १२ स्वरांचं भारतीय संगीतातील तेजोमय स्वरांगण! या सात स्वरांची नैसर्गिक ध्वनी अंतरे, त्यांच्या विविध संगतीमुळे निर्माण होणारे भाव, रस, श्रुती याची माहिती भरतमुनींच्या ''नाट्यशास्त्र'' या महत्त्वाच्या ग्रंथात मिळते आणि सुदैवाने ती आजही उपलब्ध आहे. या ग्रंथात त्या काळी गायल्या जाणाऱ्या 'जाति गायन' या प्रकाराची माहिती मिळते. पण राग, रचना याची माहिती मिळत नाही. मग साहजिकच प्रश्न पडतो की, आज शास्त्रीय संगीतात आपण जे अनेक राग ऐकतो त्यांची निर्मिती कशी आणि कधी झाली असावी?

भरताचार्यांच्या काळात 'मार्ग संगीत' म्हणजे 'वैदिक संगीत' आणि 'देशी संगीत' म्हणजे 'लोकगीतातील संगीत' असे दोन स्थूल प्रकार मानले जायचे. या देशी संगीतातूनच राग रागिणी या संगीताची निर्मिती झाली असावी असे मानले जाते. यासाठी हजार बाराशे वर्षांचा कालावधी गेला असावा असे मानले जाते. परकीयांची आक्रमणे, राज्यांच्या उलथापालथी अशा अस्थिर काळात पण संगीताची उत्क्रांती होत राहिली. अकराव्या शतकाच्या अखेरीस जयदेव कवीच्या 'गीत गोविंद' या काव्यातील अष्टपदांवर रागांची आणि तालांची नावे पहायला मिळतात. यातील 'भैरवी', 'विभास', 'बसंत', 'मालवी' हे राग आजही गायले आणि वाजविले जातात. म्हणजे अकराव्या शतकापर्यंत संगीताचा प्रवास राग आणि ताल याच्या समृद्ध टप्प्यावर पोहोचला होता. फक्त त्याचे लिखित ठोस पुरावे आढळत नाहीत. राग रचना हे भारतीय संगीताचे असाधारण आणि एकमेव विशेष आहे. ''रंजयतिती रागः'' म्हणजे रंजन करणारा तो राग अशी रागाची व्याख्या केली जाते. अनेक रागिणी यांनी नटलेले हे संगीत म्हणजे स्वर, रस आणि भाव याचा परिपोष आहे. ते इतके नैसर्गिक आणि निर्लेप आहे की, पंधराशे वर्षे हिंदुस्थानावर मुसलमान, शीख, बौद्ध, मराठे, इंग्रज अशा अनेक राजवटी झाल्या; पण भारतीय संगीतावर त्याचा वाईट परिणाम झाला नाही. उलट ते प्रत्येक संस्कृतीमधील विचार सामावून घेत, अत्यंत प्रवाही आणि चिरतरुण होत गेले.

७ स्वरां पासून रागांच्या ३ जाती झाल्या. ज्या रागात फक्त ५ स्वर येतात त्याला 'औडव' राग (उदा. भूप, दुर्गा, मालकंस), ज्या रागात फक्त ६ स्वर घेतात त्याला 'षाडव' राग (उदा. सोहनी, पूरिया, जैत कल्याण) तर सर्व ७ स्वर घेतल्या जाणाऱ्या रागांना 'संपूर्ण' राग (उदा. भैरव, भैरवी, पूर्वी, कल्याण) अशी नावे मिळाली. बाराव्या शतकानंतर दोन भिन्न पण मनोरंजक रागांची गुंफण करून अनेक जोड राग (उदा. वसंत-बहार, भूप नट, वसंती-केदार) हे प्रतिभावंतांनी तयार करून संगीत समृद्ध आणि मनमोही केले!!

(क्रमशः)

**– डॉ. कीर्ती आगाशे**

●●●

प्रेम काढून टाकल्यास आपले जग थडग्यावत होईल!

# अपराजित योद्धा - श्रीमंत बाजीराव पेशवे

*श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या अतुलनीय शौर्याचा आढावा या लेखात विशद केला आहे- संपादक*

मराठी फौजा नर्मदेपलीकडे नेऊन उत्तर दिग्विजय करणारे वीर पुरुष म्हणून थोरल्या बाजीराव पेशव्यांचे नाव आदराने घ्यावेच लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा पाया रचला आणि बाजीरावांनी त्यावर कळस चढविला असे म्हटले जाते. दक्षिणेकडील श्रीरंगपट्टणपासून संपूर्ण मध्य आणि उत्तर भारत थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मराठ्यांच्या घोड्यांच्या टाचेखाली आणला. राजपूत राजांपासून मुस्लिम नवाब आणि शाह्यांना या रावबाजीने नमवले. स्वराज्याचा डंका डौलामध्ये उत्तर हिंदुस्थानात वाजविला.

थोरले बाजीराव यांचा जन्म भाद्रपद शुक्ल पौर्णिमा शके १६२२ म्हणजेच १८ ऑगस्ट १७०० साली झाला. पहिले पेशवे बाळाजी बाजीराव हे बाजीरावांचे वडील. त्यांच्या सानिध्यात बाजीराव बरेच काही शिकले. शिपाई गडी करण्याची हौस त्यांच्यात लहानपणापासूनच होती. म्हणूनच बाळाजी पेशवे दिल्लीच्या बादशहाची भेट घ्यायला गेले तेव्हा अवघ्या १९ वर्षांचा बाजीही त्यांच्याबरोबर होता. उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेला हात-पाय पसरायच्या किती शक्यता आहेत याचा थांगपत्ता त्या कोवळ्या वयातच बाजीरावांनी घेतला होता. दुर्दैवाने त्यानंतर लगेचच बाळाजी पेशव्यांचा मृत्यू झाला नि पेशवेपदाची सूत्रे बाजीरावांच्या हातात आली. पण हा प्रसंग इतक्या सहजपणे घडणे शक्यच नव्हते. छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारी मंडळींचा कोवळ्या बाजीरावाला विरोध होता. पण छत्रपती शाहूंनी त्यांचे न ऐकता कोवळ्या बाजीरावाला या पदाचे शिक्के नि कट्यार सोपवली. छत्रपती शाहूंचा हा निर्णय बाजीरावांनी सार्थ ठरवला.

वयाच्या विसाव्या वर्षी पेशवेपद मिळवलेले हे पेशवे वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी मध्ये प्रदेशातील नर्मदे किनारी असलेल्या रावेरखेडी येथे स्वर्गवासी झाले. पण या वीस वर्षांच्या पेशवेपदाच्या कारकीर्दीत त्यांनी 'अतुलनीय' पराक्रम केला. या काळात त्यांनी एकूण ३० ते ३५ लढाया लढल्या आणि त्या सर्व जिंकल्याही. त्यातल्या २१ तर मोठ्या लढाया होत्या. लढाईत शंभर टक्के यश मिळविणारे आणि एकही लढाई न हारणारे ते एकमेव वीर आहेत.

**बाजीरावांचे युद्ध कौशल्य**

बाजीरावांनी माळवा, निमाड प्रांत ताब्यात घेतला. गुजरातमध्येही धडक मारली. पुढे आणखी उत्तर हिंदुस्थानात पसरण्याची संधीही त्यांना मिळाली. बुंदेलखंडाचे राजे छत्रसाल यांच्यावर दिल्लीच्या बादशहाचा वजीर फरीदाबादच्या बंगश पठाणांनी हल्ला चढवून त्याला कैद करून ठेवले. छत्रसाल राजांनी बाजीरावाला पत्र लिहून 'जो गति ग्राह गजेंद्र की सो गति भई जानहु आज। बाजी जात बुंदेल की राखो बाजी लाज।।' असा गजांतमोक्षाचा हवाला देऊन बाजीरावांकडे मदतीची याचना केली. पत्र मिळाल्यावर टाकोटाक ३५-४० हजारांची फौज घेऊन खुद्द बाजीराव, मोहम्मद खान बंगेशवर चालून गेले. ही हालचाल इतक्या त्वरेने केली की, बाजीराव धडकेपर्यंत मोहम्मद

खान बंगेशला काहीच समजले नाही. बेसावध बंगेश एका गढीत अडकला. बाजीरावांच्या झंजावातापुढे मोगल हैराण झाले.

राजा छत्रसाल ह्यांनी बाजीरावाच्या पराक्रमावर खूष होऊन आपल्या उपपत्नीपैकी एकीची मुलगी 'मस्तानी' बाजीराव पेशव्यांना वरली. तसेच त्यांचे रितसर लग्न लावूनही दिले. मराठी इतिहासात पेशवाईचा उल्लेख करताना बाजीरावांचे नाव येते. पण का कुणास ठाऊक त्यांच्या पराक्रमाचे योग्य दान त्यांच्या पदरात टाकले गेले नाही. अतुलनीय पराक्रम गाजवूनही ते उपेक्षित राहिल्यासारखेच वाटतात. मस्तानी हे कदाचित त्यामागचे कारण असावे. हिंदू जोधाबाईला पत्नी करून घेणारा सम्राट अकबर सर्वत्र चर्चिला जातो, पण एका मुस्लिम (मस्तानी ही प्रणामी पंथाची होती, ज्यात हिंदू व मुस्लिम यांची मिश्र उपासना पद्धत आहे.) व स्त्रीला कायद्याने पत्नी म्हणून घरी आणणारे बाजीराव मात्र उपेक्षित ठरविले जातात.

बाजीरावांची भारत-भू मध्ये आपण उपेक्षा केली तरी जगाच्या इतिहासात मात्र ते तितके उपेक्षित राहिले नाहीत. म्हणूनच 'अ कन्साईज हिस्ट्री ऑफ वॉरफेअर' या युद्धशास्त्रावर आधारित ग्रंथात फिल्ड मार्शल मॉटगोमरी यांनी जगातील सात लढायांचा उल्लेख केला आहे. त्यात पालखेड (वैजापूर-औरंगाबादजवळ) येथील लढाईचा उल्लेख आहे. या लढाईत बाजीरावांनी निजामाला पाणी पाजले. या लढाईत अतिशय वेगवान हालचाल करून बाजीरावांनी निर्णय घेतले आणि निजामाला दाती तृण धरायला लावले. याशिवाय नादिरशहाला पराभूत केले ती लढाईसुद्धा त्यांच्या अद्वितीय पराक्रमाची साक्ष देणारी आहे. १७३९ मध्ये नादिरशहाने दिल्ली लुटली. बाजीरावांनी त्याला चंबळच्या खोऱ्यात आणले आणि चक्क लढाई न करताच शत्रूचे सैन्य परत गेले. 'बाजीरावांकडे योजना आखण्याची बुद्धी होती आणि तिची अंमलबजावणी करण्यासाठी हात होते', असे इंग्रज इतिहासकार ग्रँट डफनेही लिहून ठेवले आहे.

बाजीरावांच्या लढाईची अनेक वैशिष्ट्ये आहेत. ते एक चांगले सेनापती होते. युद्ध कसे लढावे आणि कुठे लढावे याचे यथायोग्य ज्ञान उपजतच होते. घोडेस्वारांचे पथक हे त्यांचे मुख्य बळ होते. त्यांच्या शिस्तबद्ध फौजा ७५ किलोमीटर प्रती दिन या वेगाने जायच्या. त्यांच्याबरोबर सामान अगदीच कमी असे. तसेच महिला नव्हत्या. रात्री झोपण्यापेक्षा जास्त हल्ला कसा करायचा याच्या योजना ठरत. शत्रूची रसद तोडणे आणि त्याला होणारा सगळा पुरवठा तोडणे यावर भर दिला जाई. स्वतः बाजीराव घोड्यावरच झोप घेत असत. त्यावरच त्यांचे जेवण असे.

पुण्याचा शनिवारवाडाही बाजीरावांनीच बांधला. पुण्यातून हललेले मराठी सत्तेचे केंद्र त्यांनीच कोल्हापुरातून आणून पुण्यात वसविले. हिंदुस्थानभर आपल्या नावाचा धाक बसविणारे बाजीराव घरच्या कारवायांना मात्र तोंड देऊ शकले नाहीत. मस्तानीवर त्यांनी अफाट प्रेम केले तरी पुण्यातल्या तत्कालीन ब्रह्मवृंदाला, त्यांचं प्रेम त्यांच्या आईला आणि बंधू चिमाजीअप्पांना काही पटले नाही. मस्तानीपासून त्यांना समशेरबहाद्दर नावाचा मुलगाही झाला. घरच्या कारवायांनी सतत वैतागलेले बाजीराव लढाईच्या मोहिमांवरच राहू लागले. याच वातावरणात २७ फेब्रुवारी १७४० रोजी नासिरजंग विरुद्ध लढाई जिंकून मुंगीपैठण येथे तह झाला. तहात नासिरजंगने हंडिया व खरगोण हे बाजीरावांना दिले. त्याचीच व्यवस्था लावण्यासाठी ३० मार्च रोजी बाजीराव खरगोणला गेले. या स्वारीत अचानक प्रकृती बिघडून मध्य प्रदेशातील खांडवा-इंदूर मार्गावर असलेल्या सनावदजवळ नर्मदा नदीच्या किनारी रावेरखेडी येथे २८ एप्रिल १७४०

(पृष्ठ क्र.४० वर)

# मेळघाट - एक कुपोषित सत्य

*मेळघाटामध्ये कुपोषण म्हणजे काय याची देही याची डोळा अनुभवलेले अनुभव लेखकाने या लेखात कथन केले आहेत. - संपादक*

काही महिन्यांपूर्वी मेळघाटात जायचा योग आला. मेळघाट म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर येते ते फक्त कुपोषण, कुपोषित मुले आणि बालमृत्यू........ कारण आपण याच्यापलीकडे आजतागायत काहीच ऐकलेले नाही आणि त्या पलीकडे आपण विचारच करू शकत नाही किंवा करत नाही.

मी फक्त चार दिवस मेळघाटात होतो. त्यातील दोन दिवस प्रत्यक्ष कुपोषण म्हणजे काय ते 'याची देही याची डोळा' अनुभवले.

छोटेसे घर, त्यात तीन-चार लहान मुले. त्यांची अंगकाठी म्हणजे फक्त कपडे घातलेल्या काठ्याच होत्या. परंतु अन्न कुपोषणापलीकडचे कुपोषण काय असते याचीसुद्धा जाणीव झाली.

मेळघाट वैयक्तिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक या पातळ्यांवरही अति कुपोषित आहे. त्याहूनही वाईट गोष्ट म्हणजे निसर्ग संपन्न असूनही नैसर्गिक साधनांच्या बाबतीतही कुपोषितच आहे. भरपूर पाऊस पडतो, परंतु पाणी मुरतच नाही, सर्व वाहून जाते. जमीन सुपीक आहे पण शेतकऱ्यांसाठी पाणीच उरत नाही. आलेल्या पिकाला बाजारभाव मिळत असेल का नाही याबद्दल जरा शंकाच आहे. सरकारच्या योजना, सवलती अशा लोकांपर्यंत पोचतीलच याचीही खात्री नाही.

वैयक्तिक दृष्ट्या बघाल तर ही माणसे सरकार, स्थानिक नेते यांच्यावर जास्त अवलंबून वाटतात. स्वतःचे विचार, कौशल्य, कल्पकता लोप पावलेली वाटते.

शैक्षणिक पातळीवर तर खूपच गंभीर समस्या आहे. या लोकांची मातृभाषा कोरकू आहे. घरात, एकमेकांशी कोरकूत संवाद साधतात. बाहेरच्या माणसाशी हिन्दी मध्ये बोलतात आणि शालेय शिक्षण मराठीतून होते. सध्या शहरातील मराठी शाळांची अवस्था बघता येथील शाळांची आणि तेथील विद्यार्थ्यांची काय अवस्था असेल याची कल्पना करा..

अशा शैक्षणिक कुपोषणामुळे सामाजिक पातळीवरही ही माणसे एका कोपऱ्यातच अडकून पडली आहेत.

आर्थिक दृष्ट्या सुद्धा परिस्थिती बेताचीच असते. बहुतांश घरातील पुरुषच अर्थाजन करतो आणि स्त्रिया घर, संसार सांभाळतात. शेती किंवा नोकरीच्या उत्पन्नातील बहुतांश पैसे लहान मुलांचे आजारपण, दारू, तंबाखू यावरच खर्च होतात. अगदी शाळेत जाणारी मुले, बायकासुद्धा सर्रास तंबाखू, छर्रा खातात. कदाचित भूक मारण्यासाठी तो एक जालिम, स्वस्त उपाय असावा. पण एक गोष्ट मला कळली नाही की, अशा परिस्थितीतही ५०% लोकांकडे बाईक आहेत. पेट्रोलचे पैसे कुठून येतात हे गूढच आहे. बहुतेक स्थानिक राजकीय नेते मतांसाठी बाईक्स फुकट देत असावेत. परंतु पेट्रोल तर फुकट मिळत नाही ना.....किंवा कर्ज काढून घेत असतील ...देवालाच माहिती....घरात खायला पैसे नाहीत. मात्र पेट्रोल, दारूसाठी पैसे असतात.

मुळातच गावे लांब-लांब विखुरलेली आहेत. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्नच येत नाही. बस पकडायला २-३ किमी लांब चालत जावे लागते. त्यातून बसच्या फेऱ्या दिवसभरात १ किंवा २. म्हणजे जायची पंचाईत आणि गेलात तर यायची पंचाईत.

---

इच्छापूर्ती झाली म्हणजे ती आत्म्याला मधुर वाटते.

अशा परिस्थितीत इतर माणसांशी संबंध येणार कसा? विचार, समस्या आणि उपाय यांची देवाण-घेवाण होणार कशी?

आरोग्य विषयक कुपोषण तर आपल्या कल्पनाशक्तीच्या आवाक्या बाहेरचे आहे. सुदैवाने काही वर्षांपासून आपल्याला मेळघाटात आरोग्य क्षेत्र, समाजोद्धार या क्षेत्रांत काम करणाऱ्या डॉक्टर, सेवाभावी संस्था याबद्दल माहिती कळत आहे. यातील एक अत्यंत महत्त्वाचे काम म्हणजे नवजात अर्भकाला होणाऱ्या निमोनियाची कारणे शोधणे, त्याचा प्रसार रोखणे, आणि त्यावर वेळेवर उपचार करणे. त्यासाठी बऱ्याच गावांमधून आरोग्य दूत, खास करून महिला आरोग्य दूत नेमल्या आहेत. त्यात गर्भवती महिलांची काळजी घेणे, त्यांच्या पोषक आहाराची व्यवस्था करणे, नवजात अर्भकाची दैनंदिन काळजी घेणे, त्यांचे आरोग्य तपासणे, निरीक्षणांची नोंद करणे अशी कामे येतात.

मी ज्या आरोग्यदूताच्या घरी गेलो होतो तिच्या मुलाला डोक्यावर मोठे टेंगूळ आले होते आणि ते बऱ्यापैकी पिकले होते. डॉक्टरकडे का नाही नेले असे विचारल्यावर तिने सांगितले की, डॉक्टरकडे जायला वाहनच नाही. आम्ही घेऊन जातो असे म्हटले तर म्हणाली, डॉक्टरने उपचाराकरिता ठेवून घेतले तर मलाही राहायला लागेल. जर मी तिथे राहिले तर माझ्या इतर मुलांची काळजी कोण घेणार? त्यांना खायला कोण देणार? गावातील आरोग्यदूताची ही अवस्था, तर इतर लोकांकडून आरोग्यविषयक काय अपेक्षा ठेवणार?

मेळघाटातील सर्वात हादरवून टाकणारी मी अनुभवलेली घटना सांगतो. निमोनिया झाला असेल तर अर्भकाच्या शेंबूडाच्या तपासणी करिता सॅम्पल घ्यावे लागते. हे सॅम्पल घेताना घरातील माणसांना खूप समजवावे लागते. एक नवजात अर्भक निमोनियामुळे दगावले होते. अशा परिस्थितीमध्ये त्या घरातील लोकांना, जमलेल्या माणसांना समजावून सांगणे, त्या मृत अर्भकाच्या शेंबूडाचे सॅम्पल घेणे  म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे. खूप वेळा पालक तयार होतात, पण इतर नातेवाईक, जमलेली माणसे विरोध करतात. गावातील आरोग्यदूत, संस्थेचा कर्मचारी  अगदी शेवटपर्यंत त्यांची समजूत काढत होते. शेवटी मध्यरात्री अंतिम क्रिया करण्याआधी कसे बसे सॅम्पल मिळाले. असा अनुभव आल्यावर अंगावर काटा न उभा राहिला तरच नवल.

मेळघाटात असे काम करणार या सर्व डॉक्टर्स, आरोग्यदूत, संस्था, त्यांचे कर्मचारी यांना त्रिवार सलाम ..........

बरेच प्रश्न मात्र मला त्या दिवसापासून सतावत आहेत की, मेळघाटातील कुपोषण मग ते कुठल्याही प्रकारचे असो, हे पिढ्यान्‌पिढ्या चालत आले आहे की मागील ६०-७० वर्षांतील आहे?

स्थानिक पातळीवर राजकीय नेत्यांना ही परिस्थिती माहीत नव्हती का? जर माहीत असेल तर त्यांनी काहीच प्रयत्न केले नाहीत का? जर त्यांना आपल्याच भागातील परिस्थिती माहीत नसेल तर त्यांना लोक-प्रतिनिधी म्हणून राहण्याचा हक्क आहे का?????

मेळघाटातील निसर्ग सौन्दर्य, जैव विविधता या बद्दल कधीच कोणाकडून ऐकल्याचे आठवत नाही. माझ्या परिचयातील कोणीच मेळघाटात जाऊन आल्याचे ऐकिवात नाही.

कुपोषणाचे अखंड चित्र रंगवून परिस्थितीची खरी माहिती जगापर्यंत पोहोचूच नये अशी विचारधारणा मुद्दामहून रुजवल्यासारखी वाटते आणि आपणही सर्वांनी ती सहजरित्या मान्य केल्यासारखी आहे. आपण कुपोषण, बालमृत्यूच्या फक्त बातम्या ऐकणे, वाचणे, दुःख व्यक्त करणे, तिथे काम करणाऱ्या संस्थांना देणगी देणे यापलीकडे काहीही करत नाही.

**- अमोल आनंद लिमये**
भ्रमणध्वनी - ९९८७०२४०५८

फसविण्यात अत्यंत सोपी व्यक्ती म्हणजे आपण स्वतःच होय!

# श्रीकृष्ण जीवन - चिंतन

*मनुष्याने काही कठीण प्रसंगात माघार घेणे हे शहाणपणाचे असते हे श्रीकृष्णांनी आपल्या जीवनातून पटवून दिले आहे. त्याबद्दल लेखकाचे विश्लेषण या लेखात दिले आहे - संपादक*

महाभारत युद्धानंतर दुःखाने गहिवरलेल्या धृतराष्ट्राने भीमावर इतकं अपरिमित प्रेम व्यक्त केलं होतं की, त्याला हृदयाशी कवटाळावे अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. तो म्हणाला, 'मला भीमाला अलिंगन द्यायचे आहे'. पांडवांना वाटले की, पुत्रशोकामुळे एका बापाचा हृदयपालट झाला आहे आणि पांडवांना तो आपल्या पुत्रांच्या जागी पाहात आहे. श्रीकृष्णाने मात्र भीमा ऐवजी त्याच्या समोर एक लोखंडी पुतळा सादर केला. धृतराष्ट्राने त्या पुतळ्याला भीम समजून असे प्रेमाने आलिंगन दिले, अशी घट्ट मिठी मारली की त्या पुतळ्याचा चेंदामेंदा झाला. लोखंडाच्या पुतळ्याची ही हकीकत तर भिमाचं काय झालं असतं? परिस्थितीनुसार माणसांना, माणसांच्या हेतूंना आणि नात्यातील सत्याला पारखता आले पाहिजे ही खूप मोठी शिकवण श्रीकृष्णाने आपल्या जीवनातून दिली आहे.

भगवान श्रीकृष्ण हे पूर्ण पुरुषोत्तम होते. वास्तविक पाहता एखाद्या दैवी शक्तीने किंवा चमत्काराने विद्या आणि वेद अभ्यास त्यांनी सहज हस्तगत केला असता. प्रभू श्रीरामांनी गुरू वशिष्ठांच्या आश्रमात आणि श्रीकृष्णांनी सांदिपनी ऋषींच्या आश्रमात आपल्या कठोर परिश्रमातून विद्याअभ्यास पूर्ण केला.

''विद्या ही कोणत्याही चमत्कार किंवा दैवी शक्तीतून प्राप्त होणारी गोष्ट नाही, त्यासाठी परिश्रम आणि संघर्ष करावा लागतो'' ही महान शिकवण आपणास ह्या पवित्र जीवनांच्या अभ्यासातून कळते.

वास्तविकतः श्रीकृष्ण अर्जुनाचा सखा होता. महाभारतासारखा कठीण प्रसंग अर्जुनाच्या आयुष्यात येणार आहे याची त्यांना जाणीव होती. भगवदगीतेचा उपदेश श्रीकृष्णांना खूप आधी करता आला असता. परंतु कठीण प्रसंग आल्याशिवाय तत्त्वज्ञानाचे गूढ, गांभीर्य आणि महत्त्व आकलन होत नाही हा सिद्धांत त्यांना माहीत होता. हतबल झालेल्या अर्जुनाने जेव्हा युद्ध करण्यास नकार दिला, तेव्हा द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगाची आठवण करून देऊन श्रीकृष्णांना अर्जुनाच्या मनात क्रोध उत्पन्न करता आला असता, परंतु भगवदगीतेचा उपदेश करून त्यांनी 'वीतरागभयक्रोध:' असा वेदिक सिद्धांत सांगितला. क्रोध मनात ठेवून कोणतेही युद्ध जिंकता येत नाही.

भगवान श्रीकृष्ण जेव्हा शिष्टाईला पांडवांचा शांतीदूत बनून कौरवांकडे गेले तेव्हा त्यांनी संपूर्ण सावधगिरी राखली होती. ते ज्या रथात बसून गेले, तो रथ सांग्रामीक रथ होता. प्रसंग आलाच तर कृतवर्माची दोन लाख शस्त्रसज्ज सेना हस्तिनापुरात तयार ठेवली होती. प्रवासाकरिता व कौरवांच्या राजधानीत जेवढा काळ जाणार तेवढ्या काळाला पुरेल असा धान्यसाठा श्रीकृष्णांनी आपल्या सोबत ठेवला होता. दुष्टांच्या नियतीवर श्रद्धा ठेवणे हा मूर्खपणा असतो. दुर्योधनाची विनंती मान्य न करता संपूर्ण काळ शिष्टाई मध्ये श्रीकृष्णाने माता कुंती आणि विदुर यांच्यासोबत घालवला. श्रीकृष्णाची अखंड सावधानता यातून प्रतीत होते. व्यवहारकुशल माणूस तत्त्वज्ञानात पारंगत असत नाही, तत्त्वज्ञान पारंगत असलेला मनुष्य सहजासहजी व्यवहार-

या जगात सर्वात सोपी आणि निरुपयोगी गोष्ट म्हणजे चिंता करणे.

कुशल असत नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणजे तत्त्वज्ञान आणि व्यवहार कुशलता यांचा उत्कृष्ट संगम आहे.

परिस्थितीच्या प्रभावाने द्रोणाचार्य, कर्तव्यपरायणतेच्या प्रभावाने भीष्म, आणि मित्रत्वाच्या कर्तव्याने कर्ण यांनी असत्याची साथ दिली. परंतु श्रीकृष्णाने कोणत्याही नात्याच्या दबावाखाली, परिस्थितीच्या प्रभावाखाली, सत्याची कास सोडली नाही. ह्यालाच 'धर्मसंस्थापना' असे म्हणतात.

''अहंकारावर आणि षडरिपुंवर नियंत्रण ठेवून, विद्वत्तेचे नीतीसंपन्नतेमध्ये परिवर्तन करणे हाच विद्यासंपन्न मनुष्याचा पुरुषार्थ असतो.'' ही खूप मोठी शिकवण आपणास महाभारत आणि रामायण या श्रेष्ठ ग्रंथांमधून मिळते. विद्वानांचा विद्वान म्हणून रावणाची ओळख आहे. रावण हा कला, संस्कृत, वेद, अर्थशास्त्र, आयुर्वेद यामध्ये पारंगत होता. त्याचा अहंकार त्याच्या आणि त्याच्या साम्राज्याचा नाश करण्यास कारणीभूत ठरला. अहंकार आणि स्वार्थ यामुळे धृतराष्ट्र आणि दुर्योधन यांनी कुटिल नीतीचा वापर करत पांडवांचे राज्य हस्तगत केले, त्यांना वेळोवेळी मारण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्णांनी पांडवांना वेळोवेळी साथ देऊन ''अहंकारी मनुष्य नीती संपन्न मनुष्याला कधीही परास्त करू शकत नाही'' हा खूप मोठा विश्वास निर्माण केला आहे. ज्या समाजामध्ये राज्यकुलीन स्त्री सुरक्षित राहू शकत नाही त्या समाजामध्ये सर्वसाधारण स्त्रीची काय परिस्थिती निर्माण होऊ शकते ह्याची जाणीव श्रीकृष्णांनी अर्जुनाला वेळोवेळी करून दिली. म्हणून श्रीकृष्णही समाजसुधारक आहेत.

अति सद्गुणांचा वेडेपणा माणसांमध्ये नसावा असा आग्रह श्रीकृष्णांनी वेळोवेळी केलेला आहे. 'अति सर्वत्र वर्जयेत' हा आचार्य चाणक्यांनी दिलेला संदेश याच मूल्यांवर आधारित आहे. द्यूत खेळण्याचा आदेश धृतराष्ट्राने पांडवांना दिला होता. वडिलधाऱ्या माणसांनी केलेला आदेश हा पाळलाच पाहिजे ह्या अती सद्गुणांच्या आग्रहामुळे युधिष्ठिराने द्यूत खेळण्याचे आमंत्रण स्वीकारले. श्रीकृष्ण शालवाशी युद्ध करण्यात गुंतले आहेत या संधीचा फायदा घेत कौरवांनी ही कुटनीती आखली होती. द्यूत खेळायचा आहेना, मग नंतर कधीतरी खेळू; ही प्रसंगावधानता राखणे अपेक्षित होते. यामुळे वरिष्ठांच्या आज्ञेचा भंग झाला नसता. काही संकटे ही पुढे ढकलता येतात. आपण जेव्हा पूर्णपणे प्रसंगाला सामोरे जाण्यास तयार असतो तेव्हाच शत्रूशी सामना करायचा असतो हे वेळोवेळी श्रीकृष्णांनी पांडवांना लक्षात आणून दिलेले आहे.

ह्याच चारित्र्य संपन्न श्रीकृष्णांवरती तत्कालीन आणि आजच्या समाजामध्ये काही गंभीर मते आहे. रासलिले वरून श्रीकृष्णांच्या जीवनाविषयी खूप गैरसमज समाजात प्रचलित आहेत. ''सब रासलीला है मै करू तोह साला कॅरेक्टर ढीला है'' हे गाणं म्हणजे हिंदूंसाठी संतापजनक आहे. भागवताचा अभ्यास करता आपणास हे लक्षात येते की, रास वेळेला भगवान श्रीकृष्णांचे वय हे सात वर्षे होते. सात वर्षाच्या मुलांमध्ये आजही कामभावाची उत्पत्ती होत नाही. हा वैद्यकीय सिद्धांत आहे. एक सुंदर बालकाविषयी दिव्य प्रेमभाव उत्पन्न होणे हे स्त्रियांसाठी नैसर्गिक असते.

परमपूज्य पांडुरंगशास्त्री आठवले नेहमी आपल्या व्याख्यानांमध्ये दोन दृष्टांत सांगत असत. द्रौपदीने 'स्वतःच्या मदतीला धाव' अशी श्रीकृष्णांना हाक मारली. त्यावेळी द्रौपदीने श्रीकृष्णांना 'गोपीजनप्रिय' असे संबोधले आहे. केवढ्याही मोठ्या संकटात सापडलेली एखादी पतिव्रता मदतीसाठी कुणा भोगलंपट किंवा व्याभिचारी पुरुषाला हाक मारेल काय?

शिशुपाल तर श्रीकृष्णाचा कट्टर शत्रू होता. त्याने

श्रीकृष्णाची निंदानालस्ती करताना काही बाकी ठेवलेले नाही. अशा शिशुपालने देखील श्रीकृष्णांच्या विरुद्ध विलासी, व्यभिचारी किंवा भोगलंपट असल्याचा आरोप केलेला नाही. श्रीकृष्ण भरसभेत शिशुपालावर नराधम आणि स्त्रीलंपट असल्याचा आरोप करतो. जर श्रीकृष्णही त्याच्यासारखा भोगलंपट असता तर शिशुपालाने श्रीकृष्णाचा असा स्वतःवरचा आरोप गप्प बसून ऐकून घेतला असता काय? त्यांनी श्रीकृष्णांना स्वतःच्या चारित्र्याकडे नजर टाकण्याचा उपदेश केला असता. पण असा कुठलाही उल्लेख महाभारत, भागवत, किंवा कोणत्याही धार्मिक ग्रंथात सापडत नाही. श्रीकृष्णाने पहिल्या आठ पत्नी यांच्याशी राजकीय कारणामुळे लग्न केले होते व बाकीच्या हजार पत्नी यांच्याशी मानवतेचा कलंक टाळण्यासाठी लग्न केले होते.

सुभद्रेचा अर्जुनाशी विवाह लावून श्रीकृष्णांनी पांडवांचा आणि यादवांचा राजकीय संबंध आपल्या व्यवहार-चातुर्याने घडवून आणला. सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी करावा असा बलरामाचा आग्रह होता. वरिष्ठ बंधूंचा क्रोध अर्जुनावर होणार नाही याची काळजी घेत श्रीकृष्णांनी सुभद्राहरण प्रसंग आपल्या बुद्धिचातुर्याने हाताळला आहे.

आजच्या मानवाच्या समस्याची उकल श्रीकृष्णांनी अगोदरच शोधून ठेवलेली आहे. भगवदगीता हा एक अलौकिक ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचे चिंतन आपण पुढील भागात नक्कीच करणार आहोत. केवळ गरज आहे तिचा भावार्थ समजण्याची. वेद आणि उपनिषद यांचा सुंदर मेळ भगवद्गीतेत आहे. शुक्रनीती, विदुरनीती, चाणक्यनीती हे अद्वितीय ग्रंथ सुद्धा वेद आणि उपनिषद यांमधून प्रभावित झाले आहेत.

गोवधान पूजा सुरू करून समाजातील घातक रूढी आणि परंपरा यांचा विनाश वेळोवेळी करावा लागतो ही शिकवण आपल्याला श्रीकृष्णांच्या जीवनातून मिळते. छत्रपती शिवाजी यांनी केलेला स्त्रीत्वाचा आदर हा त्यांचा लहानपणी माता जिजाबाई यांनी केलेल्या ह्याच संस्काराचे फळ आहे असेच म्हणावे लागेल.

दुःशासनाने जेव्हा भर सभेत द्रौपदीला वेणी खेचून आणले, तिच्या शीलभंग करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा गुरू द्रोणाचार्य यांचे काय कर्तव्य होते? गुरू द्रोणाचार्या कौरवांचे राजकीय आश्रित होते. जेव्हा विद्वान अधर्माचा आश्रित होतो तेव्हा त्याला आपली कर्तव्यपरायणता गहाण टाकावी लागते हा सिद्धांत आहे. म्हणून 'आश्रित होऊ नका' हा संदेश श्रीकृष्णाने दिलेला आहे. कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रात लिहिलेले आहे की, 'प्रजेला अधर्माकडून धर्माकडे वळवणे ही राजाची नीती असते. म्हणून तिला राजनीती म्हणतात. हेच राजाचे आद्यकर्तव्य आहे.' असा सल्ला सभेमध्ये कोणीही दुर्योधनाला दिला नाही. अहंकाराने अंध झालेल्या कोणत्याही मनुष्याला भले तो कोणत्याही पदावर असो, त्याला योग्य मार्गाचा सल्ला देणे, हे एका सुसंस्कृत माणसाचे कर्तव्य आहे. वरिष्ठांशी सतत प्रिय वचन बोलून स्वतःचा स्वार्थ साधून घेणे हे कितपत योग्य? आश्रित नसलेला मनुष्यच ही हिंमत करू शकतो. म्हणूनच विद्वानांनी/ शहाण्या माणसाने अधर्माचा आश्रित होऊ नये ही शिकवण आपणास मिळते.

भावना या क्षणिक असतात, केवळ भावनेच्या आधारावर निर्णय घेता येत नाहीत.

''मात्रास्पर्शातू कौंतेय'' यामधून श्रीकृष्ण सांगतात की, तात्पुरती उत्पन्न होणारी आणि कालांतराने विनाश पावणारी ही सुखदुःखं आहेत, भावना आहेत ती हिवाळा-उन्हाळा यांच्या येण्या-जाण्या प्रमाणे आहेत. ती सुखदुःखे इंद्रियांना होणाऱ्या जाणिवां पासून निर्माण होतात. मनुष्याने ती क्षुब्ध न होता सहन करण्यास शिकले पाहिजे. जो

मनुष्य सुख आणि दुःख यांनी विचलित होत नाही आणि दोन्ही अवस्थांमध्ये स्थिर असतो तो मोक्षप्राप्तीसाठी निश्चितपणे योग्य आहे.

रणसंग्रामात सत्याच्या समर्थनासाठी धर्माच्या रक्षणाकरता कपट केले गेले तर त्याला काही हरकत नाही ह्यालाच 'रणनीती' म्हणतात. श्रीकृष्णांनी स्वतःचा स्वार्थ साधून घेण्यासाठी कुठलेही कपट केलेले नाही. आणि म्हणूनच त्यांचे जीवन निष्कलंक आहे. विदुर-नीती मध्ये देखील म्हटले आहे ''भावेन देवम् कपटेन शत्रू''. श्रीरामचंद्रांनी सुवर्ण मृगाचे रूप धारण करून त्याला फसवायला आलेल्या मारीच राक्षसाला म्हटले होते, ''तुझ्या स्वामीच्या आज्ञांचे पालन कर आणि अशा लोकांना मारण्याचा माझा धर्म आहे त्याचे मला आचरण करू दे''. गुरू द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कर्ण या वरिष्ठांना मारण्यासाठी केलेल्या कूटनीतीचे समर्थन हे श्रीकृष्णाने वरील प्रमाणे केलेले आहे. श्रीकृष्णाने कंसाला सुधारले नाही. काही व्यक्ती सुधारण्याच्या आणि समजावण्याच्या पलीकडे असतात. ह्या व्यक्तींशी दोन हात करावेच लागतात. म्हणूनच रामाने रावणाला आणि श्रीकृष्णाने कंसाला युद्ध करून पराजित केले, संपवले. हे भगवदगीता अनुभवातून सिद्ध झालेले ज्ञान आहे.

मनुष्याने काही कठीण प्रसंगात माघार घेणे हे शहाणपणाचे असते हे श्रीकृष्णांनी आपल्या जीवनातून पटवून दिले आहे. यादवाचे राज्य वाचविण्यासाठी श्रीकृष्णाने जरासंधाच्या आक्रमणाच्या वेळेस रणातून काढता पाय घेतला आहे. म्हणूनच 'रणछोडदास' म्हणून श्रीकृष्णाची पूजा केली जाते.

प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या दिव्य चरित्राला आपण वंदन करू या, नतमस्तक होऊ या.

**- महेश भानुशाली**

●●●

(पृष्ठ क्र. ५ वरून -**१० हॉवले प्लेस, लंडन**)

English Heritage

Lokmanya Tilak

1956 - 1920

Indian Patriot

and Philosopher

Lived Here

1918 - 1919

२००४ पासून विद्या प्रसारक मंडळाने इंग्लंडची शैक्षणिक सहल सुरू केली. या सहलीत टिळकांच्या घराला भेट देणे हा एक आनंददायी कार्यक्रम आम्ही न चुकता करतो. २०१९ पर्यंत ही सहल अखंडपणे चालू होती. या वर्षी मात्र करोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आम्हाला ही सहल रद्द करावी लागली. २०२१ च्या उन्हाळ्यात आम्ही नक्कीच सहल आयोजित करू असा विश्वास वाटतो. त्यावेळेस १०, हॉवले प्लेसला भेट देण्याचा पुन्हा योग येईल. तोपर्यंत भारतमातेच्या या महान आत्म्याला माझे विनम्र अभिवादन.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●



माणूस जितका मूर्ख, तितका तो खोटा बोलणारा असतो!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### 'ग्रोथ ऑफ बॉण्ड व मनी मार्केट इन इंडिया अपॉर्च्युनिटी फॉर फ्रेशर्स' या विषयावर व्याख्यान

महाविद्यालयाच्या बँकिंग व इन्शुरन्स विभागातर्फे बँकांच्या राष्ट्रीयीकरण दिवसानिमित्त दिनांक १९ जुलै रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथील जनरल मॅनेजर पदावर कार्यरत असलेल्या मनोज तिवारी यांचे 'ग्रोथ ऑफ बॉण्ड व मनी मार्केट इन इंडिया अपॉर्च्युनिटी फॉर फ्रेशर्स' या विषयावर व्याख्यान झाले. एकशे-पाच विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम डॉक्टर मृण्मयी थत्ते यांनी प्राचार्या डॉक्टर सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता.

### न्यायमूर्ती अंबादास जोशी यांचे व्याख्यान

महाविद्यालयाच्या मूलभूत अभ्यासक्रम विभाग, वृत्तपत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग, तसेच स्टुडन्ट फोरम आणि वाणिज्य विधी विभागातर्फे मुंबई उच्च न्यायालयाचे भूतपूर्व न्यायाधीश अंबादास जोशी यांचे 'कायद्याच्या अभ्यासाच्या नवीन पद्धती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. बीएमएम विभागाच्या प्रणव बेहरे व अमित गायकवाड या विद्यार्थ्यांनी त्यांची मुलाखत घेतली. दोनशे-दहा विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. डॉक्टर महेश पाटील, डॉक्टर प्रज्ञा राजे बहादुर यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

### कारगिल विजय दिवस साजरा

महाविद्यालयाच्या एनसीसी नेवल युनिट, आर्मी बॉईज आणि गर्ल्स यांनी दिनांक २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला. भारताने कारगिल येथे पाकिस्तानला धडा शिकवत युद्धामध्ये विजय मिळवला होता. त्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉक्टर दीपक साबळे व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. जोशी यांनी कार्यक्रम संयोजित केला होता.

### 'नवीन उद्योग कसा सुरू करावा' या विषयावर व्याख्यान

बॅचलर ऑफ कॉमर्स अकाउंटिंग अँड फायनान्स विभागातर्फे 'नवीन उद्योग कसा सुरू करावा' या विषयावर २७ जुलै रोजी श्री. अक्षय धुमाळ, संस्थापक अध्यक्ष अक्षय फाऊंडेशन व धमाल पापड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी नवीन उद्योग सुरू करण्यासाठी भांडवल वितरण तसेच व्यवसाय या बाबींचा अभ्यास करून कसे अग्रेसर झाले पाहिजे यावर यांनी प्रकाश टाकला. १९१ विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय वेबिनारचा लाभ घेतला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या समन्वयक डॉ. नीलम शेख यांनी आयोजित केला होता.

### वाणिज्य विभागातर्फे 'शेअर बाजारातील संधी' या विषयावर व्याख्यान

दिनांक २५ जुलै रोजी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे तसेच बॉम्बे स्टॉक एक्सचेंज यांच्या सहकार्याने आभासी माध्यमातून वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. 'शेअर बाजारामधील संधी' या विषयावर तृतीय वर्ष वाणिज्य विभागातील २८७ विद्यार्थ्यांनी या वेबिनार मध्ये सहभाग नोंदविला. या वेबिनारचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख रश्मी अग्निहोत्री यांनी केले.

---

सत्याचा खरा मित्र म्हणजे काळ.

**रिसर्च कमिटी व ग्रंथालय यांच्या वतीने डॉ. शुभदा नगरकर यांचे अभ्यागत व्याख्यान**

दिनांक २५ जुलै रोजी 'संशोधनातील नैतिकता व युजीसी केअरची भूमिका' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय विभागाच्या डॉ. शुभदा नगरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविक करत संशोधनाचे महत्त्व विशद केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला व कार्यक्रमाची प्रस्तावना केली. डॉक्टर नगरकर यांनी आपल्या व्याख्यानात संशोधनामध्ये वाङ्मय चौर्याला कुठलेही स्थान नाही असे प्रतिपादन केले. नवीन संशोधकाला आपले संशोधन नामांकित नियतकालिकांमधून प्रकाशित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'युजीसी केअर लिस्त' नावाचे व्यासपीठ निर्माण केले असून यामध्ये देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित जर्नल्स यांचा गोषवारा व यादी दिली आहे. भारतातील संशोधनामध्ये वाङ्मय चौर्याचे वाढते प्रमाण यावर त्यांनी युजीसी केअर काय पावले उचलत आहे यावर त्यांनी प्रकाश टाकला.

हे व्याख्यान आभासी माध्यमातून झूम या ॲपचा वापर करून झाले. ६२ प्राध्यापक या व्याख्यानात सहभागी झाले. रिसर्च कमिटीच्या प्रमुख डॉ. जयश्री सिंह यांनी आभार मानले.

**बीएमएम विभागातर्फे 'ऑनलाईन मार्गदर्शनपर व्याख्यानमाला' (२० जुलै ते १६ ऑगस्ट २०२०)**

विद्या प्रसारक मंडळाचे के. जी. जोशी कला आणि एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे यांच्या पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागाने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑनलाईन गाईडन्स लेक्चर सिरीज' दिनांक २० जुलै २०२० ते १६ ऑगस्ट २०२० पर्यंतच्या कालावधीत आयोजित केली होती. 'प्रज्वलित तो ज्ञानमय: प्रदीप:' या महाविद्यालयाच्या ब्रीदवाक्याप्रमाणे त्यांनी लॉकडाउनच्या खडतर अंधकारात मुलांसाठी ज्ञानाचे दिप प्रज्वलित केले.

या मालिकेसाठी जनसंज्ञापन आणि पत्रकारिता या क्षेत्रातील दिग्गज विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही मालिका झूम या व्यासपीठावरून पार पडली असून त्याचं थेट प्रक्षेपण फेसबुकच्या माध्यमातून झाले. ही मालिका मुलाखतीच्या स्वरूपात पार पडली.

या मार्गदर्शन मालिकेचा शुभारंभ २० जुलै २०२० रोजी 'एबीपी माझा'च्या वृत्तनिवेदिका व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी 'प्रज्ञा पोवळे' यांच्या हस्ते झाला, त्यांनी विद्यार्थ्यांशी त्यांच्या विद्यार्थीदशेपासून ते माध्यमकर्मी पर्यंतच्या प्रवासाबद्दल गप्पा मारल्या. त्यांची मुलाखत महाविद्यालयातील पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातील विद्यार्थी गार्गी गोरेगावकर आणि उमेश महाले यांनी घेतली.

या मालिकेतले दुसरे व्याख्यान बुधवार, दिनांक २२ जुलै २०२० रोजी आंतरराष्ट्रीय संबंध, चीन-भारतीय संबंध आणि साथीचा रोग या विषयावर होते. ते संशोधन विश्लेषक (तक्षशिला संस्था) आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सुरेश देसाई यांनी घेतले. त्यांची मुलाखत महाविद्यालयातील जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी समाधान जाधव आणि अक्षय मित्तल यांनी घेतली.

या मालिकेतील तिसरे व्याख्यान गुरुवार, दिनांक २३ जुलै २०२० रोजी टीव्ही ९ मराठीचे वृत्तनिवेदक आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी स्नेहील झणके यांनी घेतले. त्यात त्यांनी पत्रकारितेमधील आव्हानांचा

बद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांची मुलाखत समाधान जाधव आणि अमित गायकवाड यांनी घेतली.

त्याचबरोबर चौथे व्याख्यान शनिवार, दिनांक २५ जुलै २०२० रोजी राजेश यादव यांनी घेतले. ते कथा संशोधक, संवाद लेखक असून क्राइम पेट्रोल या मालिकेसाठीही त्यांनी लेखन केले आहे. त्यांनी कथालेखन आणि संवाद लेखनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांची मुलाखत अक्षत मित्तल आणि अथर्व फुलपगारे यांनी घेतली.

या मालिकेतील पाचवे व्याख्यान सुप्रसिद्ध कवी, गीतकार, गझलकार, प्राध्यापक श्रीपाद जोशी यांनी घेतले. त्यांनी स्टार प्रवाह वरील 'साथ दे तू मला, जिवलगा, रंग माझा वेगळा' या सारख्या मालिकांची गीते लिहिलेली आहेत. त्यांनी 'कविता लिहिण्याची एक सर्जनशील प्रक्रिया' या विषयावर भाष्य केलं. त्यांची मुलाखत गार्गी गोरेगावकर आणि उमेश महाले यांनी घेतली.

या मालिकेचे सहावे व्याख्यान ३१ जुलै २०२० रोजी अतिथी अक्षय कुमार (ट्रेव्हल आणि फूड जर्नलिस्ट, वरिष्ठ करस्पाँडंट t3 मॅक्झिन) यांची मुलाखत सय्यद आणि अक्षय मित्तल यांनी घेतली.

या मालिकेतील सातवे व्याख्यान शनिवारी, दिनांक १ ऑगस्ट २०२० रोजी माध्यम क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय संधी या विषयावर आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान सीएनबीसी-टीव्ही १८ मधील पत्रकार अनुराग तिवारी यांनी घेतले. यांची मुलाखत प्रणव बेहरे आणि अथर्व फुलपगारे यांनी घेतली

या मालिकेचे आठवे व्याख्यान शुक्रवार, दिनांक ७ ऑगस्ट २०२० रोजी 'एंटरटेनमेंट आणि जाहिरात उद्योगातील व्यवसाय संधी' या विषयावर सिद्धार्थ वाघेला (मॅनेजर - मार्केटिंग अँड बिझिनेस डेव्हलपमेंट.) यांनी घेतले. यांची मुलाखत सिरीयल सय्यद आणि अक्षय मित्तल यांनी घेतली

या मालिकेतील नववे व्याख्यान शनिवार ८ ऑगस्ट २०२० रोजी 'करिअर इन ॲडव्हर्टायझिंग' या विषयावर आयोजित केले होते: श्रद्धा अय्यर व अभिषेक सिंग या अतिथींनी मुलांना जनसंज्ञापन क्षेत्रातील व्यवसाय संधी बद्दल मार्गदर्शन केले. प्रणव बेहेरे, अथर्व देशपांडे आणि गार्गी गोरेगावकर यांनी मुलाखत घेतली.

'व्हीएफएक्सची भूमिका व फिल्म मेकिंगमधील ॲनिमेशन' या विषयावर सोमवारी १० ऑगस्ट रोजी या मालिकेचे दहावे व्याख्यान आयोजित केले. व्हीएफएक्स कम्पोझिटर आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी साईनाथ काशीकेदार, यांनी घेतले. त्यांची मुलाखत अथर्व फुलपगारे आणि अक्षात मित्तल यांनी घेतली.

मालिकेत अकरावा व्याख्यान ११ ऑगस्ट २०२० रोजी नॉन ट्रॅडिशनल मीडिया या विषयावर होते. सामाजिक कार्यकर्ते आणि चित्रपट निर्माते पवित्रा श्रीवास्तव यांनी घेतले होते. यांची मुलाखत प्रणव बेहरे आणि अथर्व देशपांडे यांनी घेतली.

या व्याख्यानमालेतील बारावे आणि अंतिम व्याख्यान जुईली कांडपिले यांनी 'पीआर ॲज अ करियर' या विषयावर घेतले. पीआर या क्षेत्रातील व्यवसाय संधी बद्दल बद्दल त्या बोलल्या. त्यांची मुलाखत फरियल सय्यद आणि अथर्व फुलपगारे यांनी घेतली.

ही संपूर्ण व्याख्यानमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, त्याचबरोबर बी एम एम व बी एम एम सी विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ह्या व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या असं विधान

बी एम एम आणि बी एम एम सी विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले'. ही संपूर्ण व्याख्यानमाला यशस्वीरित्या पार पडण्यामागे विद्यार्थी स्वयंसेवक तसेच सर्व शिक्षकांचा मोलाचा वाटा होता.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या विभागाने ९ वी टेक्नोगुरु पौर्णिमा ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर साजरी केली. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ''ऑनलाईन प्रोजेक्ट स्पर्धा'' व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली.

१) Creating a mobile app

२) Creating an animated video

वरील विषयांतर्गत स्पर्धा आयोजित केली होती. १५ जुलै २०२० पर्यंत विद्यार्थ्यांनी स्पर्धेला नोंदणी केली. विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या Alumini कडून ऑनलाईन प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जुलै – २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**

१ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी लिहिलेल्या शोध निबंधाला ४३ एच इंडेक्स असणाऱ्या अमेरिकन सायंटिफिक प्रकाशनाच्या स्कोपस इंडेक्स्ड जर्नल कॉम्प्यूटेशनल अँड नॅनोसायन्स जर्नल मध्ये प्रकाशनासाठी मान्यता मिळाली.

२ – ६ जुलै : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, एआयसीटीई – पश्चिम प्रांतातर्फे आयोजित युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यूज या विषयावरील ५ दिवसांच्या कार्यशाळेला उपस्थित राहिले.


ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION
NELSON MANDELA MARG, VASANT KUNJ, NEW DELHI

Certificate of Participation

This is to certify that Dr. Arloph Johnviera from Dr. V.N. Bedekar Institute of Management Studies, Thane has participated and successfully completed the online workshop on Universal Human Values on the theme "Inculcating Universal Human Values in Technical Education" during 2-6 July, 2020 as organized by All India Council for Technical Education(AICTE).


Dr. Rajneesh Arora
Chairman
National Coordination Committee for Induction Program

Prof. Rajive Kumar
Member Secretary, AICTE

३ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी डेटा एनालिटिक्स आणि ऑपरेशन्स प्रोफाइलसाठी दैनिक भास्करमध्ये खालील उमेदवारांना पदवीपूर्व कार्य /कामकाज प्रशिक्षण संधी (इंटर्नशिप) उपलब्ध करून दिली.


प्रियांका शिंदे, पीजीडीएम ऑपरेशन्स
सिदार्थ भुर्के, एमएमएस ऑपरेशन्स

३ जुलै : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा यांनी ५२ पानांचा ब्रिम्स कनेक्ट ई–मासिकाचा जूनचा अंक प्रकाशित केला आणि सर्व विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना पाठविला.




४ जुलै : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सतर्फे डॉ. नीतिन जोशी यांचे गोल सेटिंग या विषयावरील वेबिनार आयोजित करण्यात आले. या वेबिनारचे सूत्र संचालन प्रा. कंचन अक्षय यांनी केले.




४ जुलै ते ९ ऑगस्ट : डॉ. आर्लोफ जॉन व्हिएरा, प्रा. महेश भानुशाली आणि प्रा. विभूती सावे यांच्या पथकाने ५ आठवड्याचा एस.सी.एम. ऑनलाइन अभ्यासक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. अभ्यासक्रमाचे समन्वयन दर्शना कोळी यांनी केले.

५ जुलै : डॉ. स्मिता जपे यांनी स्पर्श फॅब्रिकच्या कर्मचाऱ्यांना आर्थिक ताळेबंद / निवेदने समजून घेणे आणि निर्णय घेणे या विषयावर ऑनलाईन व्यवस्थापकीय प्रशिक्षण कार्यक्रम (एमडीपी) यशस्वीरित्या आयोजित केला. ३ संचालक आणि विपणन, लेखा, प्रकल्प प्रमुख आणि बिलिंग विभाग यासारख्या विविध विभागाच्या सदस्यांसह एकूण ३० सहभागींनी यात भाग घेतला. स्पर्श फॅब्रिकचे संचालक विकास तोडी यांच्यासह सर्व सहभागींनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे कौतुक केले.




६ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी पीजीडीएम फायनान्स मधील अजय जयस्वाल या विद्यार्थ्याला रोजगार संधी उपलब्ध करून दिली.

७ ते १८ जुलै : प्रा. विभूती सावे यांनी आयएमसी आरबीएनक्यूए ट्रस्ट तर्फे आयोजित सीईक्यूएम रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला. रीफ्रेशर कोर्स पूर्ण झाल्यानंतर त्यांना आरबीएनक्यूए कडून मूल्यांकन करण्याची एक संधी मिळाली आहे.




९ जुलै : मायक्रोसॉफ्ट टीम तर्फे आयोजित, मायक्रोसॉफ्ट टीम सॉफ्टवेयरच्या प्रात्यक्षिक कार्यक्रमाला प्राध्यापक सदस्य उपस्थित राहिले.

१० जुलै : प्रा. सिद्धेश सोमण यांनी सर्व वित्त शाखेच्या (फायनान्स) विद्यार्थ्यांसाठी फायनान्स क्विझ आयोजित केले. एकूण ६३ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला.

१० जुलै : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थ्यांसह ऑनलाईन ब्रीम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

११ जुलै : प्राध्यापक सदस्यांनी एज्युझिला प्रशिक्षण आणि स्टुडंट एंगेजमेंट फॉर ऑनलाईन लर्निंग या सत्रात सहभाग घेतला.

१३ जुलै : प्रा.कृणाल के पुंजानी यांनी युजीसी / स्कोपस / एबीडीसी सूचीबद्ध जर्नल्ससाठी – हाऊ टू फायनलाईझ रिसर्च टॉपिक फॉर क्वालिटी रिसर्च पेपर. – ५ स्टेप प्रोसेस या विषयावर एक व्हिडिओ तयार केला.

१४ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी ऑपरेशन्स आणि सप्लाय चेन प्रोफाइलसाठी ३.५. लाख पगाराच्या ई–कॉमर्स क्षेत्रातील प्रख्यात अशा दिग्गज 'फ्लिपकार्ट' कंपनी मध्ये खालील पाच उमेदवारांना यशस्वीरित्या रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या.

श्री. विस्मित फुलझेले, एमएमएस ऑपरेशन्स

श्री. अनिकेत कोडलिंगे, पीजीडीएम मार्केटिंग

कु. चैताली चावाके, एमएमएस ऑपरेशन्स

श्री. अशोक जाखड़, एमएमएस ऑपरेशन्स


श्री. दुर्गेश सावंत, एमएमएस ऑपरेशन्स

१४ जुलै : डॉ. स्मिता जपे यांना उडेमी कडून ॲडव्हान्स एक्सेल कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळाले.





१६ जुलै : आय.आय.टी. खडगपूर कडून, नावीन्य आणि उद्योजकता या विषयावर प्रा. महेश भानुशाली यांनी ८ दिवसांचा प्राध्यापक विकास कार्यक्रम (एफडीपी) यशस्वीरित्या पूर्ण केला. त्यांना परीक्षेत ७०% गुण मिळाले. तसेच 'एफएमसीजी मधील चॅनेल पार्टनर्ससाठी इन्स्टंट ऑर्डर बुकिंग' या मोबाइल अनुप्रयोगावरील त्याच्या कल्पनेचे आयआयटी कडून कौतुकही झाले.

१७-२४ जुलै : डॉ. स्मिता जपे यांनी आयक्यूएसी (अंतर्गत गुणवत्ता आश्वासन समिती) सदस्यांसह कॅम्पस टू कॉर्पोरेट - करियरचा पुढचा मार्ग या विषयावर आमच्या




विद्यार्थ्यांसाठी उद्योग तज्ज्ञांची ऑनलाईन व्याख्यान/संवाद माला आयोजित केली.



२० जुलै : रोटरीतर्फे आयोजित करिअर मॅनेजमेंट समुपदेशन सत्रामध्ये डॉ. नीतिन जोशी यांनी क्राफ्ट युवर करिअर याविषयावर व्याख्यान दिले.

२० जुलै : इंटरनॅशनल जर्नल ऑफ फायनान्स अँड अकाउंटिंग या एबीडीसी सूचीबद्ध जर्नलच्या समीक्षक म्हणून डॉ. स्मिता जपे यांची दोन वर्षांसाठी नेमणूक झाली.

२० जुलै : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी युजीसी / स्कोपस / एबीडीसी सूचीबद्ध जर्नल्ससाठी गुणवत्तापूर्ण शोधनिबंधाची प्रस्तावना कशी लिहावी - एक ४ चरण प्रक्रिया. यावर एक व्हिडिओ तयार केला.

२१ जुलै : डॉ. स्मिता जपे यांना एबीडीसी सूचीबद्ध असलेल्या इंटरनॅशनल जर्नल ऑफ फायनान्स अँड बँकिंगसाठी समीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२४ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी आयक्यूएसी समितीच्या वतीने एमएमएस आणि पीजीडीएम विद्यार्थ्यांसाठी व्हीआयपी इंडस्ट्रीजच्या प्रादेशिक प्रमुख सुश्री उषा उडुपा यांच्या अतिथी / संवाद सत्राचे आयोजन केले. आमचे दोन माजी विद्यार्थी सूरज चव्हाण आणि मयूर कांबळे यांनाही अधिवेशनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. महेश भानुशाली यांनी अधिवेशनाचे संचालन केले. हे एक अतिशय माहितीपूर्ण सत्र ठरले

ज्यात माजी विद्यार्थ्यांनी देखील व्हीआयपी कंपनी मधील त्यांचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला.

२७ जुलै : प्रा. कृणाल के पुंजानी यांनी युजीसी / स्कोपस / एबीडीसी सूचीबद्ध जर्नल्स साठी अंडरस्टॅण्डिंग ओरिजिनॅलिटी फॉर क्वालिटी रिसर्च पेपर – ७ टेक्निक्स या विषयावर एक व्हिडिओ तयार केला.

२८ जुलै : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली एमएमएसची विद्यार्थिनी कांती राऊत, आयआयटीतर्फे आयोजित प्रकरण अभ्यास स्पर्धेत सहभागी झाली.

३० जुलै : कोझीकोड येथील इंडियन इंन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट चे, डॉ. श्रीजेश एस. पिल्लई आणि ग्वालियरच्या प्रेस्टीज इंन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे, डॉ. आर पी एस कौरव यांच्या डेमिस्टीफाइंग लिटरेचर रिव्यू टेक्निकस्स या विषयावरील ४ दिवसांच्या प्राध्यापक विकास कार्यक्रम (एफडीपी) मध्ये प्रा. कृणाल के. पुंजानी उपस्थित राहिले.

३१ जुलै : पूर्वा अजगावकर, रेवती पदतुरे, सयाली पालव, सयाली वालंज, अदिबा मुकादम, तन्वी कोलते आणि सोनिया वर्मा यांच्या प्रथम वर्षाच्या एमएमएस विद्यार्थ्यांच्या पथकाने प्रा. कृणाल के. पुंजानी यांच्या मार्गदर्शनाखाली 'आयडिया', 'प्रूफ ऑफ कॉन्सेप्ट' आणि 'प्रोटोटाइप' दस्तऐवज तयार केले. एमएचआरडी आयआयसी नॅशनल इनोव्हेशन कॉन्टेस्टसाठी प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी त्यासंबंधीचा तपशील एमएचआरडी आयआयसी वेबपोर्टलवर अपलोड केला.

प्रा. कृणाल के. पुंजानी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली, प्रा. विभूती सावे आणि प्रा. संदीप मोघे – या ब्रीम्सच्या आयआयसी समितीने इनोबिझ – इनोव्हेशन स्पर्धा (जुलै) चे संयोजन केले. सोल्यूशन नोट्स मिळविण्यासाठी आणि सर्व संघांचे मूल्यांकन करण्यासाठी वरिष्ठ परीक्षकांशी समन्वय साधला.

डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी खालील तीन व्हिडिओ तयार केले.

१. साहित्य पुनरावलोकन कसे आणि का करावे?

२. हाऊ टू कोड डेटा इन एसपीएसएस फॉर एक्सेल.

३. एन्ट्री ऑफ डेटा फ्रॉम एमएस एक्सेलक टू एसपीएसएस सॉफ्टवेअर.

पुढील वेबिनार किंवा अभ्यासक्रमांना प्राध्यापक उपस्थित राहिले.

| **Faculty** | **Webinar** |
|---|---|
| Dr. Smita Jape | Empower Youngsters to Successful 2nd Generation Entrepreneurs<br>Panel Discussion on "Teaching Online In India : Challenges and the Way Ahead" organized by CII |
| Dr. Arloph Johnviera | Building Resilient Supply Chain in a Post Covid World<br>Woman in Solar Power Industry<br>Driver Based Forecasting in a Covid 19 World<br>Test Yourself -How Smart is your Factory<br>Talk on Future of Wind Energy |

| | |
|---|---|
| | On using AI and IOT to keep the workforce safe and to keep business continuity<br>India into New Space Age : Opportunities and Challenges<br>Road Ahead : Retail & Consumer Market Trends<br>The Bionic Supply Chain : Fast Lane to the Future<br>UAE Solar Market : Opportunities and Challenges<br>Helping Admission Win in 2020<br>Personal Branding<br>Digitial Campus on Cloud for Education<br>Attended a full day (8 hrs) Higher Education Conclave of North India conducted by ELETS<br>Full Day CONCLAVE : Higher and Technical Education Conclace - North India<br>Unlesh the Power of CDN Platform for faster and Secured Digital Experience by TATA Telecommunications<br>Teaching Online in India : Challenges and Way ahead<br>Adaptation of Technology to Business Excellence by Mr. Jayant Joshi<br>Impact of Covid on Indian Economy<br>Move from Dashboards & PPT to Digital , Real time & Cross Functional P & L focused IBP<br>Elevate your admission via Digital Marketing<br>LTL Life Cycle Automation and Visibility Crash Course |
| Prof. Kanchan Akshay | Family Managed Business<br>'Migrant Labour' organized by BMA<br>Campus to Corporate<br>'Understanding the impact of Personality and Emotional Intelligence' organized by BMA<br>'Online Teaching' by CII |
| Dr. Meenakshi Malhotra | Research Planning using Elsevier tools : Scopus and Science Direct<br>Panel Discussion on "Teaching Online In India: Challenges and the Way Ahead " organized by CII |
| Prof. Mahesh Bhanushali | 'Transforming Education through Global Collaboration - The Roadmap' jointly organized by University of Pune and Sinhgad Institute of Management. |

द्वेष करणाऱ्या माणसाची नजर फार तीक्ष्ण असते!

| | |
|---|---|
| Prof. Krunal K. Punjani | Digital Transformation and Marketing Analytics" conducted by KCT Business School<br>Adapting Creative Formats for OTT Advertising" conducted by Economic Times Brand Equity<br>MHRD IIC's Online Launch of Drug Discovery Hackathon conducted by MHRD Innovation Cell<br>"Why academic publication is important? "conducted by Dr. P. Murugan from School of Management Studies, University of Hyderabad<br>How to choose the right journal for publishing your research" conducted by Wiley Publications<br>"Understanding Research Ethics and Integrity in Academia" organized by Wiley Publications Team |

●●●

(पृष्ठ क्र. २०वरून–**केसरीवरील संस्कृत व मराठी वचने**)

होती. मंडाले मध्ये तुरुंगवासात असताना ते त्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस ह्यांच्याकडून पुण्याहून संदर्भ ग्रंथ मागवून घेत असत. त्यांचे ग्रंथ-लेखनाचे तंत्र इतके सक्षम होते की, 'त्यांनी एका तळटिपेत रामकृष्ण मिशनच्या, वेदांत केसरी' या नियत कालिकात त्या वेळी विद्यार्थी असणाऱ्या राधाकृष्णन यांच्या एका लेखाचा संदर्भ दिला आहे असे वाचल्याचे आठवते.

**– प्रभाकर आपटे**
सी / ४०१ बुद्धदेव विहार,
टिकुजीनी वाडी जवळ,
ठाणे (पश्चिम) – ४०००१०
भ्रमणध्वनी – ७०२१७७६५१५

**– सुधा साठ्ये**
सी ९/८, सुकुमार सहनिवास,
दयालदास मार्ग, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई ४०००५७
भ्रमणध्वनी – ९८१९३७८३४२/८८५०८५२१०९

●●●

(पृष्ठ क्र. २५ वरून – **अपराजित योद्धा – श्रीमंत बाजीराव पेशवे**)

(वैशाख शुद्ध शके १६६२) रोजी पहाटे हे महापराक्रमी पेशवे विषमज्वराने स्वर्गवासी झाले. मृत्यूवेळी ते अवघ्या चाळीस वर्षांचे होते.

''जीवाची बाजी लावणे'' हा वाक्प्रचार आपल्या कर्तृत्वाने जन्माला घालणाऱ्या या महान योध्याला सलाम!

**– प्रसाद बापट**
मॅकेनिकल इंजिनियरींग विभाग
वि. प्र. मं. चे महर्षी परशुराम अभियांत्रिकी
महाविद्यालय, वेळणेश्वर.

●●●





## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें  तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।। १ ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतुं भूतां ।। ४ ।।
चलां कल्पतरुंचे आरव । चेतनाचिंतामणीचें गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।
चंद्रमें जें अलांछन । मार्तंड जें तापहीन । ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु  ।। ६ ।।
किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।। ८ ।।
येथ म्हणें श्रीविश्वेश्वरावों । हा होइल दान पसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।। ९ ।।

## सार्थ पसायदान

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरू यांनी माझ्या वाग्यज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, की, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन, स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्रांच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंक रहीत प्रतिचंद्र, संसाररूपी अंधकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचे अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्री ज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.